दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकः बाळासाहेब मस्के




## नमाज पठणाविरोधात हनुमान चालीसा

### धार्मिक: महाविद्यालयात तणाव



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

वाराणसी येथील उदय प्रताप महाविद्यालयात चांगलंच तणावाचं वातावरण पाहण्यास मिळालं. कारण विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरु केलं होतं. यापैकी सात विद्यार्थ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. नेमकी ही घटना काय घडली? जाणून घेऊ. उदय प्रताप महाविद्यालयाच्या आवारात एक मशीद आहे. या मशिदीजवळ शुक्रवारचं नमाज पठण करण्यासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी जमा झाले. ज्यानंतर हिंदू विद्यार्थ्यांनी हनुमान चालीसाचा जप सुरु केला. यानंतर जो काही तणाव निर्माण झाला तो निवळावा यासाठी पोलिसांना बोलवण्यात आलं. पोलिसांनी सात आंदोलक विद्यार्थ्यांना ताब्यात घेतलं आहे. संभल येथील मशिदीच्या वादाचं लोण या महाविद्यालयातही पोहचल्याचं पाहण्यास मिळालं.

दरम्यान महाविद्यालय प्रशासनाला उत्तर प्रदेश सुन्नी वक्फ बोर्डाने २०१८ मध्ये एक नोटीस जारी केली होती. ही नोटीस सोशल मीडियावर व्हायरल झाली. या नोटिशीत महाविद्यालय व्यवस्थापनाला हे सांगण्यात आलं होतं की वाराणसीतील वसीम अहमद नावाच्या व्यक्तीने महाविद्यालय परिसरात जी मशीद आहे त्या मशिदीच्या जमिनीची नोंदणी वक्फ बोर्डाची मालमत्ता म्हणून करावी ही मागणी केली. मात्र तूर्तास या जागेबाबत वक्फ बोर्डाकडे कुठलेही प्रश्न प्रलंबित नाहीत असं महाविद्यालयाने स्पष्ट केलं. मात्र हे कारण आणि व्हायरल झालेली नोटीस यामुळे हा वाद पेटला. याचं महत्त्वाचं कारण ठरलं ते म्हणजे आजच्या शुक्रवारी या मशिदीत नमाज पठण करण्यासाठी सुमारे ६०० लोक आले होते. ही पान २ वर...

### उदय प्रताप महाविद्यालय परिसरात पाच संस्था

उदय प्रताप महाविद्यालय ही संस्था १०० एकरांमध्ये वसलेली शैक्षणिक संस्था आहे. या परिसरात उदय प्रताप महाविद्यालय, राणी मुरार कुमारी बालिका इंटर कॉलेज, उदय प्रताप पब्लिक स्कूल, मॅनेजमेंट कॉलेड आणि ऑटोनोमस कॉलेज अशा पाच संस्था आहे. या ठिकाणी या शैक्षणिक संस्थांमध्ये सुमारे १७ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. दरम्यान हा वाद झाल्याने उदय प्रताप महाविद्यालय चर्चेत आलं आहे.

## संभलमध्ये दंगलखोरांचे फलक

### प्रशासन: ६ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर बंदोबस्त

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

संभलमध्ये २४ नोव्हेंबर रोजी घडलेल्या हिंसाचारात सहभागी संशयितांचे फलक प्रशासनाकडून लावण्यात येणार आहेत. संभलमध्ये झालेल्या हिंसेत एक कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज पोलिसांनी काढला आहे. दरम्यान, ६ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर परिसरातील बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. या दिवशी १९९२ मध्ये अयोध्येतील बाबरी मशीद पाडण्यात आली होती.जिल्हा महादंडाधिकारी राजेंद्र पेनसिया यांनी सांगितले, की संभलमधील हिंसेत सहभागींचे फलक आजच सगळीकडे लावण्यात येतील. मशिदीतील सर्व्हेवरून झालेल्या हिंसेशी संबंधित ४०० लोकांची ओळख तपास यंत्रणांनी केली आहे. तसेच, शांतता समितीची बैठकही आयोजित केली असून, सर्व परिस्थितीवर बैठकीत चर्चा करण्यात येईल. ज्यांना अटक केली आहे, त्यांचे फलक लावली जाणार नाहीत.हिंसेशी संबंधित उर्वरित आरोपींना अटक करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची प्रतिक्रिया पोलीस अधीक्षक कृष्ण कुमार बिष्णोई यांनी दिली. आतापर्यंत



३४ जणांना अटक करण्यात आली आहे. हिंसेत सहभागी ८३ लोकांची नावे समोर आली आहेत. आरोपींची ४०० छायाचित्रे एकत्र करण्यात आली आहेत. हिंसेत एक कोटी रुपयांहून अधिक नुकसान झाले आहे. ट्रान्सफॉर्मर जाळणे, कॅमेऱ्यांची तोडफोड, वाहनांची जाळपोळ आदींचा यात समावेश आहे. दंगलखोरांकडूनच त्याची वसुली केली जाईल.

आरोपींना पकडण्यासाठी मदत करणाऱ्यांना बक्षीसही दिले जाणार आहे. उत्तर प्रदेशात यापूर्वीही 'सीएए'विरोधात झालेल्या हिंसेत सहभागी संशयितांचे फलक लावण्यात आले होते.



## देवेंद्र फडणवीस पून्हा आले

### शपथविधी: पहिल्याच तासात घेतली बैठक

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तसेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर तीनही नेते हे मंत्रालयात आले. त्यांनी मंत्रालयातील महापुरूषांच्या प्रतिमांना वंदन केले. शपथविधी झाल्यानंतर पहिल्या तासातच महायुती सरकारची पहिली मंत्रिमंडळ बैठक मंत्रालयात झाली. शपथविधीनंतर लगेचच मंत्रिमंडळाची बैठक घेऊन हे सरकार गतिमान असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकप्रकारे दाखवून दिले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला सूचना केल्या आणि अधिक गतीने आणि जोमाने काम करण्यास सांगितले. जनतेच्या अपेक्षांची पूर्ती करण्यासाठी आपल्याला अधिक वेगाने काम करावे लागेल, असे ते अधिकाऱ्यांना म्हणाले. आता गती वाढवू आणि अधिक खोलवर जाऊन चांगले निर्णय घेऊन शाश्वत विकास कसा साध्य करता येईल त्या दृष्टिकोनातून प्रयत्न करूयात, असेही ते म्हणाले.दरम्यान ७ डिसेंबर रोजी विधीमंडळाचे विशेष अधिवेशन होणार असल्याचीही माहिती समोर येत आहे. नवनिर्वाचित आमदारांना आमदारकीची शपथ देणे गरजेचे आहे. त्यासाठी कदाचित हे विशेष अधिवेशन घेतले गेल्याची शक्यता वर्तविली जात आहे.मंत्रालयात गेल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे लाडक्या बहिणींनी स्वागत केले. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. यात ते म्हणाले की, मागच्या अडीच वर्षांत घेतलेले निर्णय यापुढेही नेले जातील. सर्व समाजांना घेऊन जाणारे लोकाभिमूख सरकार पुढील काळात पाहायला मिळेल, असेही ते म्हणाले.

### पहिली स्वाक्षरी वैद्यकीय फाईलवर

मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली. पुणे येथील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाखांची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश त्यांनी फाईलवर दिले आहेत. चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती.

## फ्रान्सच्या पंतप्रधानांचा राजीनामा

### देशविदेश: उजव्याडाव्यांनी सरकार पाडले

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

फ्रान्समध्ये अर्थसंकल्पावरून झालेल्या मतभेदांमधून तीन महिन्यांपूर्वीच पंतप्रधान झालेल्या मिशेल बार्निए यांना राजीनामा द्यावा लागला आहे. विशेष म्हणजे मेरिल ली-पेन यांच्या नेतृत्वाखालील अतिउजवा पक्ष आणि अतिडाव्या पक्षांनी एकत्रित मोर्चेबांधणी करून सरकार उलथविले. आता राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ नव्या सरकारची घोषणा करेपर्यंत बार्निए काळजीवाहू पंतप्रधान म्हणून काम पाहतील.बार्निए यांनी त्रिशंकू पार्लमेंट असताना मतदानाशिवाय अर्थसंकल्प मंजूर करून घेण्याचा प्रयत्न चालविला होता. या



अर्थसंकल्पाच्या मसुद्यानुसार वित्तीय तूट भरून काढण्यासाठी ठेवींमधून ६० अब्ज युरोची उचल प्रस्तावित पान २ वर...

### आर्थिक पेचाच्या उंबरठ्यावर

स्थिर सरकारअभावी अर्थसंकल्प मंजूर होण्याचा मोठा प्रश्न फ्रान्सपुढे उभा ठाकला आहे. २०२४ वर्ष संपत आले असताना २०२५ची आर्थिक तरतूद रखडणार आहे. फ्रान्सच्या राज्यघटनेत अशा परिस्थितीत विशेष तरतूद असल्यामुळे शासन-प्रशासन ठप्प होण्याचा धोका नसला, तरी देशातील अन्य आर्थिक उलाढालींना याचा फटका बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**चर्चेतले** मूळ विधेयक लोकसभेत संमतीची शक्यता

## वक्फ'मध्ये महत्त्वाचे बदल नाहीच?

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

वक्फ दुरुस्ती विधयेकामध्ये आवश्यक बदल सुचवण्यासाठी संयुक्त संसदीय समितीमध्ये (जेपीसी) सखोल चर्चा होत असली तरी, कोणतेही महत्त्वाचे बदल न करता लोकसभेत मूळ विधेयक संमत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.राज्यांच्या वक्फ मंडळांकडील जमिनीची मालकी निश्चित करण्यासंदर्भात मूळ विधेयकामध्ये ४८ दुरुस्त्या सुचवण्यात आल्या आहेत. त्यातील प्रमुख चार दुरुस्त्यांना 'जेपीसी'च्या बैठकांमध्ये 'इंडिया' आघाडीतील सदस्यांनी तीव्र विरोध केला. वक्फ मंडळावर बिगर



मुस्लीम सदस्यांची नेमणूक होणार, वक्फ मंडळांवर निवडणुकीऐवजी नियुक्त्या केल्या जाणार, वक्फची जमीन निश्चित करण्याचे पान २ वर...

### बरखास्तीची शक्यता कमीच!

'जेपीसी'तील काही सदस्यांनी तसेच, बैठकीमध्ये सादरीकरण करणाऱ्या अनेकांनी वक्फ मंडळेच बरखास्त करण्याची सूचना केल्याचे समजते. पण, त्याबाबत 'जेपीसी'मध्ये सविस्तर चर्चा झालेली नाही. शिवाय, केंद्र सरकारच्या स्तरावरही ही सूचना गांभीर्याने घेण्यात आलेली नाही. त्यामुळे 'जेपीसी'च्या अहवालातही वक्फ मंडळाच्या बरखास्तीची शिफारस केली जाण्याची शक्यता नसल्याचेही समजते.

## पुष्पा-२ चित्रपटादरम्यान चेंगराचेंगरी

### दुःखद: महिलेचा झाला मृत्यू



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

अभिनेता अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' चित्रपटाच्या खेळावेळी चेंगराचेंगरी झाल्याने एका महिलेचा मृत्यू झाला. तसेच महिलेल्या मुलाला रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी गुरुवारी सांगितले. बुधवारी रात्री ही घटना घडली. अल्लू अर्जुनला पाहण्यासाठी चाहत्यांनी चित्रपटगृहात मोठी गर्दी केली होती. या गर्दीमुळे चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाल्याचे महिलेच्या पतीने माध्यमांना सांगितले. चित्रपटगृह व्यवस्थापनाकडून कोणतीही व्यवस्था करण्यात आली नव्हती तसेच अभिनेता आणि चित्रपटातील इतर कलाकार येणार असल्याची कोणतीही पूर्वकल्पना नसल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

## आल्यानंतरचे आव्हान!

सर्वप्रथम देवेंद्र फडणवीस यांचे मन:पूर्वक अभिनंदन. आधी सहकारी, नंतर प्रतिस्पर्धी आणि मध्ये स्वपक्षीय श्रेष्ठी अशा तीन पातळ्यांवर अपमान आणि अवहेलना सहन करून ते स्पर्धेत टिकून राहिले आणि असा विजय संपादित केला की त्यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ घालण्याखेरीज अन्य कोणताही पर्याय नेतृत्वासमोर शिल्लक राहिला नाही. या विधानसभा निवडणुकीत भाजपच्या विजयाचा आकार इतका आहे की एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार या दोन उपमुख्यमंत्र्यांसही फडणवीस यांच्या हातास हात लावून 'मम' म्हणण्याखेरीज फार काही करण्यास वाव राहणार नाही. एव्हाना या दोघांनाही भाजपचे नेतृत्व ही काय चीज आहे याचा पुरेसा अंदाज आलेला असणार. या दोघांचेही मागे वा अन्य कोठे जायचे दोर आता कापले गेलेले आहेत. त्यामुळे पदरात पडेल ते त्यांस गोड मानून घ्यावे लागणार. त्यास इलाज नाही. या दोन पक्षांच्या राजकारणावर गेल्या काही दिवसांत पुरेसे भाष्य झालेले आहे. त्यामुळे पुनरुक्तीची गरज नाही. आता वेध घ्यावयाचा तो देवेंद्र फडणवीस यांच्या आगामी कार्यकालाचा. याआधी २०१३ साली त्यांच्या हाती जेव्हा राज्य भाजपची सूत्रे दिली गेली तेव्हा 'लोकसत्ता'ने 'देवेंद्रीय आव्हान' या शीर्षकाचे (८ मे २०१३) असे संपादकीय लिहून त्यांच्या अध्यक्षपदाबाबत भाष्य केले. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जेव्हा त्यांच्यावर उपमुख्यमंत्रीपद लादले गेले तेव्हा 'देवेंद्रीय आव्हान:२.०' या संपादकीयातून (१९ सप्टेंबर २०२२) 'लोकसत्ता'ने त्यांच्यावर ओढवलेल्या परिस्थितीवर टिप्पणी केली. या दोन्हींपेक्षा आजची परिस्थिती आमूलाग्र बदललेली आहे. तेव्हा फडणवीस यांसही आपल्यातील नवेपण समोर आणावे लागणार.

म्हणजे मधल्या काळात त्यांनी ज्या विविध पक्षीय गणंगांस जवळ केले तसे आता करून चालणार नाही. त्या वेळी त्यांनी तसे करण्यास एक कारण होते. ते म्हणजे पक्षांतर्गत होणारा विरोध. तो तीव्र होता. त्यामुळे फडणवीस यांस पक्षांतर्गत विरोधक जास्त होते. त्यामुळे त्यांनी बाहेरच्या पक्षांतील अनेकांस भाजपत आणले आणि स्वत:चा समर्थक-पाया तयार केला. या उपायाने त्यांना पक्षांतर्गत स्पर्धकांवर मात करण्यात यश आले, हे खरे. पण त्यामुळे फडणवीस यांच्या राजकीय चारित्र्यावरही चार शिंतोडे उडाले. त्या काळात त्यांच्या आसपास जमलेली प्रभावळ इतकी दिव्य होती की हाच का तो संस्कारी भाजपचा संस्कारी नेता, असा प्रश्न पडावा. बारा पक्षांचे पाणी प्यायलेले आणि विविध पातळ्यांवरील 'दुकानदारी'साठी कुख्यात अनेक जण फडणवीस यांस लोंबू लागल्याने त्यांचे भले झाले असेल; पण फडणवीस यांस बदनामीचा भार सहन करावा लागला. ते तसे होणारच होते. पण टाळता आले असते तर फडणवीस यांची कारकीर्द तेव्हा अधिकच उजळती. कदाचित तेव्हा तसे करणे ही त्यांची राजकीय अपरिहार्यता असावी. आता ती नाही. त्यामुळे गेल्या खेपेस उचलावे लागलेले चुकीचे पाऊल या वेळी आपल्याकडून पडणार नाही, याची खबरदारी त्यांस घ्यावी लागेल. नेता असो वा सामान्य व्यक्ती. अंतिमत: त्याची प्रतिमा त्याची संगत ठरवत असते. तेव्हा या वेळी फडणवीस यांस असंगांशी संग टाळावा लागेल. तसे काही करावे लागण्याची अपरिहार्यता या वेळी नाही. कारण पक्षांतर्गत आणि पक्षाबाहेरही फडणवीस यांनी आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवलेले आहे आणि त्यांना आता पक्षात स्थानिक पातळीवर तरी आव्हानवीर/ स्पर्धक नाही. त्यात मध्यंतरीच्या काळात जे झाले, जे त्यांना सहन करावे लागले यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या वेळी फडणवीस यांच्या पाठिंब्यासाठी कंबर कसली. संघाचा आधार नसल्यावर आणि असल्यावर काय होते या प्रश्नाचे उत्तर लोकसभा आणि विधानसभा निवडणूक निकालात मिळते. ते स्पष्ट आहे. हा संघाधार या वेळी अधिक स्पष्ट झालेला असल्याने आणि तो कोणास आहे हेही लपून राहिलेले नसल्याने फडणवीस यांच्यासाठी आगामी काळ पक्षांतर्गत पातळीवर निष्कंटक असेल यात शंका नाही.त्यांच्यासमोर या वेळी आव्हान असेल ते राज्याची प्रतिमा सुधारण्याचे. फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात नाणार येथे येऊ घातलेला भव्य तेलशुद्धीकरण प्रकल्प शिवसेनेच्या विरोधामुळे त्यांना आणता आला नाही. तेच वाढवण बंदर प्रकल्पाबाबतही घडले. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेस चुचकारण्याच्या नादात फडणवीस या प्रकल्पांच्या आघाडीवर काहीही करू शकले नाहीत. त्या वेळी शिवसेनेचा विरोध डावलून हे प्रकल्प राज्यात यावेत असा पुरस्कार 'लोकसत्ता'ने अनेकदा केला. तेव्हाही राजकीय अपरिहार्यतेने फडणवीस यांस रोखले. पण पुढे शिवसेनाही त्यांच्यापासून दुरावली आणि हे प्रकल्प राज्यापासून दुरावले जातात की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. आता फडणवीस यांच्यामागे 'अधिकृत' शिवसेना आहे. तेव्हा अन्यांची फारशी फिकीर त्यांना बाळगण्याचे कारण नाही. महाराष्ट्र अजूनही गुंतवणूकयोग्य आणि गुंतवणूक स्पर्धेत आहे हे चित्र नव्याने निर्माण करण्याची जबाबदारी फडणवीस यांची. गुजरात, कर्नाटक, आंध्र वा तमिळनाडू आदी राज्यांच्या तुलनेत मध्यंतरी महाराष्ट्र चांगलाच मागे पडला असल्याचे चित्र निर्माण झाले. ते किती खरे, किती खोटे याची चर्चा करण्यात अर्थ नाही. कारण सध्याचा 'आभास हेच वास्तव' असे मानले जाण्याचा काळ. त्यामुळे महाराष्ट्र स्पर्धेत नाही असे चित्र निर्माण झाले असेल तर त्याच्या खऱ्या खोट्याची सत्यासत्यता न करता ते बदलण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. हे चित्र बदलणे हे खरे डोंगराएवढे आव्हान. फडणवीस यांना या खेपेस ते पेलावे लागेल. महाराष्ट्राचे असे प्रतिमा-हनन हे अंतिमत: देशालाही परवडणारे नाही. हे आव्हान वाहताना प्रश्न असेल तो राज्याच्या खंक होत चाललेल्या तिजोरीचा. 'लाडकी बहीण' वगैरे कौतुक निवडणुकीपुरते(च) ठीक. त्यांना सध्या दिली जात असलेली १५०० रुपयांची मासिक भाऊबीज सुरू ठेवणे अवघड. पण त्यात जर आणखी ६०० रु. प्रति महिना अशी वाढ करावयाची असेल तर राज्याच्या तिजोरीस पडलेल्या छिद्राचे भगदाड होणार हे निश्चित. ते बुजवता आले नाही तर त्याचे पातक लवकरच माजी होणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वा माजी आणि आजीही अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या डोक्यावर फुटणार नाही. त्यासाठी जबाबदार धरले जाईल ते मुख्यमंत्री फडणवीस यांनाच.

# आधुनिक भारताच्या निर्मात्यास अभिवादन

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि आधुनिक भारताचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन ! बाबासाहेबांची विद्वत्ता आणि तर्कशुद्ध विचारसरणी पाहून त्यांची मसुदा समितीच्या अध्यक्षपदी एकमताने निवड झाली. मसुदा समितीमध्ये डॉ. आंबेडकरांशिवाय इतरही सहा सदस्य होते. मात्र भारतासाठी राज्यघटना लिहिण्याची जबाबदारी संपूर्णपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर पडली. संविधान समितीने नेमलेल्या निरनिराळ्या समित्यांनी म्हणजेच केंद्रीय अधिकार समिती , केंद्रीय घटना समिती, प्रांतिक घटना समिती आणि मूलभूत हक्क ,अल्पसंख्यांक , आदिवासी क्षेत्रे इत्यादींवरील सल्लागार समित्या यांच्या अहवालांवर संविधान समितीने घेतलेल्या निर्णयानुसार घटना तयार करण्याची जबाबदारी मसुदा समितीची होती आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे या समितीचे अध्यक्ष होते. भारतीय राज्यघटनेचा मसुदा आठ महिने जनतेच्या विचारार्थ ठेवलेला होता . या प्रदीर्घकाळात मित्रांना , टीकाकारांना व विरोधकांना मसुद्यातील तरतुदींवर आपली प्रतिक्रिया व्यक्त करण्यास पुरेसा अवधी मिळालेला होता. यातील काही प्रतिक्रिया गैरसमजुतीतून व अपुऱ्या माहितीतून व्यक्त झालेल्या होत्या. टीकाकारांची अपुरी माहिती असो की गैरसमजूत असो. टीका झालेली होती म्हणून डॉ. आंबेडकर टिकेला उत्तर देताना म्हणतात. संविधानाच्या विधिनियमांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हातात या संविधानाची प्रत पडली तर तो दोन प्रश्न नक्कीच उपस्थित करेल. संविधानामध्ये कोणत्या प्रकारची शासन व्यवस्था सांगितलेली आहे हा त्याचा पहिला प्रश्न असेल; आणि दुसरा प्रश्न म्हणजे संविधानाचा आकृतीबंध कोणता आहे ? हे दोन निर्णायक प्रश्न असल्याने प्रत्येक राज्यघटनेला या दोन प्रश्नांचा विचार करावाच लागतो. या दोन प्रश्नांपैकी पहिल्या प्रश्नाचे उत्तर देताना संविधान सभेत बाबासाहेब म्हणतात संविधानाच्या मसुद्यानुसार भारतीय संघराज्याच्या सर्वोच्च पदी कार्यकारी अधिकारी आहे. आणि तो कार्यकारी अधिकारी म्हणजे राष्ट्रपती होय. कार्यकारी अधिकाऱ्याचा हुद्दा आपल्याला अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षासारखा वाटत असला तरी, दोन नावातील



साधर्म्य सोडल्यास अमेरिकेतील शासन व्यवस्था आणि आपल्या संविधानाच्या मसुद्यात प्रस्तावित केलेली शासन व्यवस्था यात समान काहीही नाही. अमेरिकेतील शासन यंत्रणेला अध्यक्षीय शासन पद्धती म्हणतात तर , आपण मात्र संसदीय शासन पद्धती स्वीकारलेली आहे. हा भारत व अमेरिका येथील शासन यंत्रणेतील मूलभूत फरक आहे. भारतीय संविधानात भारत हा राज्यांचा संघ आहे असा शब्दप्रयोग करण्यात आलेला आहे. भारताचे संघराज्य विकेंद्रीकरण प्रवृत्तीमधून निर्माण झालेले असून केंद्र सरकार व घटक राज्य यांच्यात अधिकारांची विभागणी करण्यात आलेली आहे. परंतु मध्यवर्ती सरकारला जास्त प्रमाणात अधिकार देण्यात आलेले आहेत. घटक राज्यांमध्ये संघर्ष निर्माण झाल्यास किंवा केंद्र सरकारशी घटक राज्यांचा संघर्ष निर्माण झाला तर संविधानाचा अर्थ लावून त्याचा निवाडा करण्यासाठी व नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी डॉ . आंबेडकरांनी न्यायालयाची तरतूद केलेली आहे. न्यायालयाचा निर्णय संघराज्य ,घटक राज्ये सर्व संस्था , व्यक्ती , अधिकारी व इतर कनिष्ठ न्यायालयांवर बंधनकारक आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील प्रत्येक नागरिकासाठी भारतीय राज्यघटनेत मूलभूत अधिकारांची तरतूद केलेली आहे. मूलभूत अधिकार राज्यघटनेच्या कलम १४ ते १८ मध्ये नागरिकांसाठी मूलभूत अधिकार देण्यात आलेले आहेत. समतेचा अधिकार: भारतीय राज्यघटना अस्तित्वात येण्यापूर्वी सर्वांना कायद्याचे समान संरक्षण नव्हते. काही जातीतील लोकांवर अन्याय होत असे . अनेक वेळा धर्म व जातीनुसार न्याय दिला जात असे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेच्या कलम १४ मध्ये असे स्पष्ट म्हटले आहे की , कोणत्याही व्यक्तीला कायद्याच्या समान संरक्षणापासून वंचित केले जाणार नाही . सर्व व्यक्तींसाठी एकच कायदा असेल. धर्म , जात , वंश, स्त्री-पुरुष, जन्मस्थान या आधारावर नागरिकांमध्ये कोणत्याच प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही . अशी तरतूद करण्यात आलेली आहे. पूर्वी सर्वांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यामुळे अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती , ओबीसी व सर्वच जाती धर्मातील स्त्रिया यांना नोकरी मिळण्याचा प्रश्नच नव्हता. म्हणून राज्यघटनेच्या सोळाव्या कलमात अशी तरतूद करण्यात आलेली आहे की, प्रत्येक नागरिकाला आपल्या पात्रतेनुसार नोकरी करण्याचा , पदग्रहण करण्याचा समान अधिकार असेल. बाबासाहेबांनी सोळाव्या कलमात ही तरतूद केल्यामूळेच आज भारतीय स्त्रिया अनेक क्षेत्रात



डॉ. नंदकुमार उघाडे
लेखक व राज्यघटनेचे अभ्यासक

मानाचे व सन्मानाचे पद भूषवताना दिसतात . रूढी परंपरेच्या जाचक अटीमध्ये चाचपडणाऱ्या स्त्रियांना अंधकारातून बाहेर काढण्याची तरतूद राज्यघटनेमध्ये करण्यात आली म्हणूनच आज विविध क्षेत्रांमध्ये स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करताना व सन्मानाचे जीवन जगताना आपणास दिसत आहेत.

स्वातंत्र्याचा अधिकार: कोणत्या ही व्यक्तीला आपले विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य मिळालेले आहे. पूर्वी व्यवसाय व व्यापार जातीनुसार , धर्मानुसार चालत असे . कोणत्याही व्यक्तीला कोणताही आपल्या आवडीचा व्यवसाय , व्यापार , रोजगार करण्याचे स्वातंत्र्य राज्यघटनेनुसार मिळालेले आहे. बाविसाव्या कलमानुसार कोणत्याही व्यक्तीला अटक झाल्यास आपणास कोणत्या कारणासाठी अटक झाली हे जाणून घेण्याचा अधिकार मिळालेला आहे. अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तीला जवळच्या न्यायालयात २४ तासाच्या आत हजर करावे लागते. न्यायालयाच्या परवानगीशिवाय २४ तासांपेक्षा जास्त काळ व्यक्तीला अटकेत ठेवता येत नाही अशी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे कोणत्याही जातीतील , धर्मातील व्यक्तीला विनाकारण अटक होऊ शकत नाही. अशा प्रकारचे स्वातंत्र्य राज्यघटनेनुसार प्रत्येक भारतीयाला मिळालेले आहे. राज्यकर्त्यांनी राज्यकारभार कसा करावा यासाठी राज्यघटनेमध्ये मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेमध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आपल्या राज्यकर्त्यांनी राज्यकारभार केला असता तर , किंवा मार्गदर्शक तत्वांचे तंतोतंत पालन केले असते तर भारताने अमेरिकेला केव्हाच मागे टाकले असते. देशाची एकता व एकात्मता टिकविण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांची असते. दोन धर्मांमध्ये बंधूभाव निर्माण करण्यासाठी राज्यकर्त्यांनी प्रयत्न करावयाचे असतात . वास्तव परिस्थिती मात्र बदलत चाललेली आहे. मतांचा टक्का वाढवून सत्ता टिकवण्यासाठी काही नेतेमंडळी धार्मिक तेढ निर्माण होईल असे वक्तव्य करताना दिसून येतात. यामध्ये इलेक्ट्रॉनिक मीडिया सुद्धा मागे नाही . अनेक टीव्ही चॅनेल्स वरती चर्चा पाहताना हे प्रकर्षाने जाणवते. देशहित व समाज हित यावर चर्चा होण्याऐवजी नको त्या विषयावर अनेक टीव्ही चॅनेल्स चर्चा करण्यात धान्यतः मानतात ही दुर्दैवाची गोष्ट आहे. राज्यघटनेमध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार राज्यकर्त्यांना राज्यकारभार करण्यास भाग पाडण्यासाठी प्रत्येक भारतीयाने राज्यघटना समजून घेणे आवश्यक आहे.

## बीड विशेष मोक्का न्यायालयाने शिक्षक साजेद अली खून प्रकरणात आरोपींना दोषी ठरवले!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील बहुचर्चित शिक्षक साजेद अली खून प्रकरणात बीडच्या विशेष मोक्का न्यायालयाने १८ पैकी १४ आरोपींना दोषी ठरवले आहे. विशेष न्यायाधीश सुरेखा पाटील यांच्या न्यायालयाने गुजर खान उर्फ अन्वर खान मिर्झा खान यांच्यासह १४ आरोपींना दोषी ठरवत सरफराज काझी, फैज मोहम्मद खान आणि सय्यद नूर उर्फ मिना यांना निर्दोष मुक्त केले आहे.या प्रकरणाचा अंतिम निकाल सोमवार, ९ डिसेंबर रोजी जाहीर केला जाणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या प्रकरणातील सर्व आरोपींना कडेकोट पोलीस बंदोबस्तात न्यायालयात आणण्यात आले होते. न्यायालय परिसरात सुरक्षा व्यवस्था म्हणून एक डीवायएसपी, चार पोलीस निरीक्षक आणि १५० पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले होते.

९ सप्टेंबर २०१९ रोजी बीड शहरातील बालेपीर भागात सैनिकी विद्यालयाचे शिक्षक साजेद अली (वय ३८) यांची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात १८ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीसांनी तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.प्रकरणाचा खटला विशेष न्यायालयात सुरू होता. या खटल्यात एकूण ४४ साक्षीदार तपासण्यात आले तर बचाव पक्षातर्फे ५ साक्षीदार तपासले गेले. साक्षीपुरावे, वैद्यकीय अहवाल, न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेचा अहवाल आणि परिस्थितीजन्य पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने १४ आरोपींना दोषी ठरवले. या खटल्यात सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील ॲड. अजय तांदळे यांनी काम पाहिले. त्यांना जिल्हा सरकारी वकील ॲड. अजय राख यांचे मार्गदर्शन लाभले. पैरवी अधिकारी पीएसआय व्ही. जायभाये यांनीही महत्त्वाचे सहकार्य केले.या प्रकरणाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून, सोमवारी दोषींच्या शिक्षेचा निकाल जाहीर होईल.

## जिल्ह्यात विविध ठिकाणी रक्तदान शिबीराचे आयोजन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या ७४व्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात विविध ठिकाणी शनिवार दि.७ रोजी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड, गिता कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड, शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिवणी, गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजुरी नवगण, सोनाजीराव क्षीरसागर वैद्यकिय महाविद्यालय बीड, पाडळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळी, यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कुर्ला, कामखेडा हायस्कुल कामखेडा, साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय साक्षाळपिंप्री, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मोरगाव, आर्वी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आर्वी, पिंपळवाडी हायस्कुल पिंपळवाडी, अंजनवती हायस्कुल, अंजनवती, बोरखेड हायस्कुल बोरखेड, जगदंबा हायस्कुल राक्षसभुवन (तांबा), रायमोह, चौसाळा, कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडसिंगी, पाटोदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाटोदा (बे.), कोरड्याची वाडी हायस्कुल कोरड्याची वाडी, लोणी हायस्कुल लोणी, संत एकनाथ विद्यालय पालसिंगन, कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरूर (का.), औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय बीड, कला सह आदी ठिकाणी रक्तदान शिबीराचे आयोजन दि.०७/१२/२०२४ रोजी करण्यात आले.

## पान एक वरून

**नमाज पठणाविरोधात....**संख्या एरवीच्या शुक्रवारी ४० ते ५० असते. ज्यानंतर या नमाज पठणाला विरोध म्हणून हनुमान चालीसा म्हणण्यास इतर विद्यार्थ्यांनी सुरुवात केली आणि वाद चिघळला.मशिदीमध्ये ६०० जण जमा झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या गेटवर जमत मोठमोठ्याने हनुमान चालीसा म्हणण्यास सुरुवात केली. दोन समूहांतला हा वाद इतका वाढला की शेवटी पोलिसांना पाचारण करावं लागलं. पोलिसांनी सात जणांना ताब्यात घेतलं. यातले काही विद्यार्थी हे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी होते. शांततेचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला. मात्र आजच या मुलांना जामीनही मंजूर करण्यात आला. इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिलं आहे

**फ्रान्सच्या पंतप्रधानांचा**

करण्यात आली होती. याला विरोध असलेल्या अतिउजव्या आणि अतिडाव्या पक्षांनी बार्निए यांच्यावर अविश्वास प्रस्ताव आणला होता. गुरुवारी हा प्रस्ताव पार्लमेंटने मंजूर केल्यानंतर पंतप्रधानांना पायउतार होण्यावाचून गत्यंतर राहिले नाही. अत्यंत मुरलेले राजकारणी असलेल्या बार्निए यांनी ५ सप्टेंबर रोजी पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती. अवघ्या तीन महिन्यांत पायउतार व्हावे लागल्यामुळे त्यांचे सरकार हे फ्रान्सच्या इतिहासात सर्वांत अल्पजीवी ठरले आहे. तसेच १९६२ साली जॉर्ज पाँपिडो यांच्यानंतर पार्लमेंटमध्ये अविश्वास प्रस्तावात पराभूत झालेले ते पहिलेच पंतप्रधान ठरले आहेत.

**वक्फ'मध्ये महत्त्वाचे**

अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना मिळणार आणि वक्फ मंडळाकडील जमिनींची नोंदणीची पूर्वलक्ष्यीप्रभावाने पडताळणी केली जाणार, या चार प्रमुख दुरुस्त्या केंद्र सरकारने विधेयकात समाविष्ट केल्या आहेत. विधेयकातून या दुरुस्त्या काढून टाकण्यास 'जेपीसी'तील सत्ताधारी सदस्यांनी विरोध केला आहे.राज्यातील एका बड्या उद्योजकाला वक्फची जमीन दिली गेली. पूर्वलक्ष्यीप्रभावाने सगळ्या नोंदी आणि व्यवहार पाहिले जाणार असतील तर उद्योजकाशी वक्फ मंडळाने केलेल्या व्यवहाराची चौकशी करणार का, असा सवाल 'जेपीसी'तील सदस्य व शिवसेना-ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी केला. विरोधकांच्या महत्त्वाच्या चार आक्षेपांची दखल घेऊन वक्फ दुरुस्ती विधेयकात बदल केले पाहिजेत, असे सावंत यांनी सांगितले. वक्फच्या जमिनी अनेक ठिकाणी बळजबरीने घेतल्या गेल्या आहेत. त्याविरोधात कारवाई करण्याचे अधिकार सरकारकडे असले पाहिजेत. त्यासाठी जमीन नोंदणीची पडताळणी पूर्वलक्ष्यीप्रभावाने केली पाहिजे, असे मत भाजप खासदार व 'जेपीसी'च्या सदस्या मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले. 'जेपीसी'तील सदस्यांनी वेगवेगळ्या राज्यांना भेटी दिल्या आहेत. पण, आणखी काही राज्यांना भेट देणे गरजेचे असेल तर आम्ही तिथल्याही संबंधित लोकांशी चर्चा करू, असे कुलकर्णी यांनी सांगितले. 'जेपीसी'चे सदस्य जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आदी राज्यांना भेट देण्याची शक्यता आहे.

## पान सहा वरून

**वन्य प्राण्यांपासून शेतकऱ्यांच्या**

शासनाने आता रात्रीचा विजपुरवठा सुरु केला आहे. रात्रीच्या वेळी वन्य प्राण्यांचा वावर असतो. साप, विंचू, रानडुक्कर तसेच काही ठिकाणी बिबट्याचा मुक्त संचार असल्याच्या घटना निदर्शनास येत आहेत. त्यांच्यापासून शेकऱ्यांना धोका निर्माण झाला आहे. अशातच रात्रीच्या वेळी पिकाला पाणी देण्यासाठी शेतात गेलेल्या शेतकऱ्यांवर ते हल्ले करत असल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यात अनेकांना आपला आपला जीव गमवावा लागला तर अनेकांना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. या घटना टाळव्यात यासाठी शासनाने दिवसा विजपुरवठा करावा अन्यथा महावितरण कंपनीच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे.

**सिंदफणा शाळेच्या यशात**

विद्यार्थ्यांचा सहभाग असेल. देशभरातील विविध राज्यांमधून या स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड झाली आहे. नागपूर येथे झालेल्या निवड चाचणीत या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट कौशल्याने स्पर्धकांना मागे टाकत राष्ट्रीय पातळीवरील संधी मिळवली आहे.शिवम, स्नेहल, आणि शिवराज यांनी आपल्या शालेय स्तरावरील क्रीडा कौशल्याच्या जोरावर शाळेचा व बीड जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला आहे. त्यांच्या या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठी प्रेरणा निर्माण झाली असून, शाळा आणि क्रीडा क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना शाळेचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके, उपाध्यक्ष विरेन सोळंके, सचिव मंगलताई सोळंके, समन्वयक नीला देशमुख, प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य राहुल कदम, शाळेचे क्रिडा संचालक दीपक माने, क्रिडा शिक्षक पुरुषोत्तम सोळंके, वैशाली सोळंके, सचिन मंजुळे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पालक यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत हे विद्यार्थी आपले कौशल्य सिद्ध करतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

**लोणार येथे भव्य सत्कार**

आयोजित केला. व यशस्वी केला. यावेळी व्यासपीठावर मा नंदूभाऊ बोरे मा कांताभाऊ मापारी मा शांतीलाल गुगलीया मा किशोरभाऊ मापारी मा साहेबराव पाटोळे मा चिभडे मामा मा अशोकराव पोफळे मा विनायक मापारी मा वामनराव मोरे मा शेख करामत मा रौफ मेंबर मा जीवन घायाळ मा बुधवत ई पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मा नितीन शिंदे व आभार मा कांबळे सर यांनी मानले.

**प्रभू विश्वकर्मा संघटनेच्या**

रामकिसन पांचाळ तात्या पांचाळ यांची उपस्थिती होती.दरम्यान ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने यांनी पांचाळ यांचे स्वागत करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

**पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी**

राजाभाऊ पास्टे, भारत पास्टे, राजाभाऊ घोडके, संभाजी चव्हाण, बाळु घोडके यांच्या सह परिसरातील नागरिकांनी आणि गावकऱ्यांनी सत्कार करुन त्यांचे अभिनंदन केले.

**प्रतिमा उंचावणारे कर्तव्यदक्ष**

आहे. हे शब्दात सांगता येणार नाही, आज पहितले तर ग्रामीण भागातील एक तरुण आज शेतकरी च्या कामासाठी रात दिवस धावत राहतो.यांचा अभिमान वाटत आहे, कसलाही गरजवंत रूपचंद आभारे यांच्याकडे गेला तर कधीच निराश होऊन आला नाही आणि येणार पण नाही असा विश्वास नक्कीच आम्हाला वाटतो, सामान्य कुटूंबात जन्म झालेले रुपचंद आभारे आज बीड जिल्ह्यात परिचित झाले असले तरी त्यांचे पाय अजून जमिनीवरच आहेत हा त्यांच्या मनाचा मोठेपणा वाटतो, आजही माती आणि नाती कायम जपली त्यामुळे त्यांचे नाव आदराने घेतले जाते, अतिशय खडतर जीवन जगत आभारे यांनी संघर्ष केला असून शासन प्रशासनात कुठेही नाव निघाले तर खरंच माणूस कामाचा आहे असे म्हटले जाते. कित्येक गोरगरिबांच्या मदतीला धावून गेले, अनेक रुग्णांना उपचारासाठी मदत केली.रक्ताचा तुटवडा होऊ नये म्हणून ते प्रत्येक वर्षी त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करतात . रक्तदान देण्याचे पुण्य तलाठी रुपचंद आभारे यांनी केले आहे. त्या रुग्णांचा लाख मोलाचा आशीर्वाद सदैव पाठीशी रहावा आणि रुपचंद आभारे साहेबांना उदंड आयुष्य मिळो याच वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा

**विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे**

वतीने बीड जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेदरे यांचा या उपक्रमाबद्दल सत्कार करण्यात आला. समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी दानशूर व्यक्तींनी पुढे यावे असे आव्हान ॲड. श्रीनिवास बेदरे यांनी यावेळी बोलताना केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सुशील टकले यांनी केले या वेळी तालुका अध्यक्ष किरण अजबकर, बळीराम भाऊ गिराम, योगेश तात्या बोबडे, महेश जगताप यांच्यासह काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## विद्यार्थ्यांचा 'परीक्षेला सामोरे जाताना' या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभाग आणि रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण व रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हर साईड यांच्या संयुक्त विद्यमाने आचार्य अत्रे रंगमंदिरात ९ वी ते १२ वी च्या विद्यार्थीवर्गास, परीक्षेसाठी त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत व्हावा, या दृष्टिकोनातून "परीक्षेला सामोरे जाताना" या विशेष प्रशिक्षणपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी ४६० विद्यार्थी, २०० पालक व शिक्षक उपस्थित होते. "मनशक्ती" प्रयोग केंद्र, लोणावळा या संस्थेचे जीवनदानी साधक सुहास गुधाटे यांनी विद्यार्थ्यांनी परीक्षेला धैर्याने कसे सामोरे जावे, मनाची एकाग्रता, मेंदू व्यायाम, झोपेतून शिक्षण, सारांश पद्धत, अभ्यासाच्या सोप्या पद्धती "मनशक्ती" संशोधित उपाय घरच्या घरी विद्यार्थ्यांनी कसे करावेत, परीक्षेला जाताना मनाची स्थिती शांत असावी, टीव्ही व मोबाईलचा वापर योग्य तेवढाच करावा, याबाबत समुचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाअखेरीस रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण व रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हर साईडतर्फे सर्व विद्यार्थ्यांना "मनशक्ती"निर्मित उपायात्मक साहित्याची भेट देण्यात आली.

# महापालिका निवडणुकीत भाजपाचा स्वबळाचा नारा

## भाजपा जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी दिले संकेत

**ठाणे (प्रतिनिधी) :**

मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड होत असल्याने देशाचे आर्थिक केंद्र असलेल्या महाराष्ट्राचे राज्यशकट भाजपा महायुतीच्या हाती आले आहे. भाजपाच्या या अभूतपूर्व यशात ठाणे जिल्हयाचा मोठा वाटा आहे. या पाश्वभूमीवर येणाऱ्या महापालिका निवडणुका भाजपा नेतृत्वाच्या आदेशानुरूप होणार आहेत. तेव्हा, प्रत्येक प्रभागांमध्ये लढण्यासाठी भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता सज्ज असुन कार्यकर्त्यांनी तशी तयारी देखील केली आहे. असे स्पष्ट संकेत भाजपा जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी माध्यमांशी



बोलताना दिले.


केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी "शतप्रतिशत भाजपा" ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचे सुतोवाच प्रचारात केले होते. त्यानंतर विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला १३५ इतके अभूतपूर्व यश मिळाले. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा वरचश्मा असलेल्या ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभापैकी १६ जागा महायुतीने पटकावल्या असुन यात एकट्या भाजपाने निम्म्या म्हणजेच तब्बल ९ जागा जिंकून भाजपाच मोठा भाऊ असल्याचे सिद्ध केले आहे. या यशाने भाजपाचा आत्मविश्वास वाढला असून गेले काही दिवस भाजपाच्या जोर बैठका सुरू झाल्या आहेत. त्याचबरोबर सदस्यता नोंदणी मोहिमेद्वारे पक्ष बलवान करण्यासाठी प्राधान्य दिले जात आहे.

दरम्यान, राज्याच्या नेतृत्वपदी देवेंद्र फडणवीस यांच्या निवडीवर शिवकामोर्तब होण्यापूर्वी ठाणे महापालिकेतील भाजपाच्या माजी नगरसेवकांनीही नुकतीच मुंबईतील सागर बंगल्यावर देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत शतप्रतिशत भाजपा करण्यासाठी कंबर कसली आहे. ठाणे जिल्ह्याच्या राजकारणात आजवर युती व बेरजेच्या राजकारणात भाजपाला सत्तेत नेहमीच दुय्यम स्थानी समाधान मानावे लागले. मात्र आता कार्यकर्त्यांचा स्वबळाचा आग्रह वाढला असल्याने ठाणे महापालिकेतील प्रत्येक प्रभागात लढण्यासाठी भाजपाचा कार्यकर्ता सज्ज असल्याचे वक्तव्य जिल्हाध्यक्ष वाघुले यांनी केले आहे.

### वातावरण बदलामुळे आवक कमी

## टोमॅटो, वाटाण्याचा दरात वाढ

**नवी मुंबई (वार्ताहर) :**



पावसामुळे उत्पादन कमी त्यात वातावरण बदलाचा फटका टोमॅटो आणि मटार पिकांना बसला आहे. परिणामी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत टोमॅटो आणि मटारची आवक कमी होत असून दर वधारले आहेत. मागील एक महिन्यापासून टोमॅटो दर आवाक्यात होते परंतु टोमॅटोच्या दराने पुन्हा उसळी घेतली असून प्रतिकिलो चाळीशी गाठली आहे. हिरव्या वाटाण्याच्या दरातही वाढ झाली आहे.

बदलत्या वातावरणाने टोमॅटोच्या दर्जावर परिणाम होत आहे. त्याचबरोबर परतीच्या पावसाने टोमॅटो पिकाचे नुकसान झाल्याने बाजारात सध्या आवक कमी होत असून त्यामुळे दरात वाढ झाली आहे. बाजारात २८ गाड्यांद्वारे १४६८ क्विंटल टोमॅटो आवक झाली आहे. दरात प्रतिकिलो १०-१२ रुपयांची वाढ झाली आहे. मंगळवारी घाऊक बाजारात प्रतिकिलो ४० रुपयांनी विक्री झाली आहे. मागील काही दिवसांपासून मटारचे दर आवाक्यात आले होते, परंतु मंगळवारी पुन्हा घाऊक बाजारात वाटाण्याची आवक घटल्याने दरात प्रतिकिलो १५-२० रुपयांनी वाढ झाली आहे. घाऊक बाजारात आधी प्रतिकिलो ६५-७० रुपयांनी उपलब्ध असलेला वाटाणा आता ८०-९० रुपयांनी विक्री होत आहे.

तसेच मटारचीही आवक कमी आहे. राज्यातील सातारा, नाशिक येथील वाटाणा दाखल होत आहे तर परराज्यातील आवक कमी झाली आहे. पावसामुळे उत्पादन कमी त्यात वातावरण बदलाचा फटका बसत असल्याने आवक कमी होत आहे. त्याचप्रमाणे हिरव्या वाटाण्याला ज्याठिकाणी अधिक बाजारभाव आहे त्याठिकाणी त्याचा पुरवठा वाढला आहे. त्यामुळे ही एपीएमसीत आवक रोडावली आहे. यंदा मटारचे उत्पादन आणि आवक कमीच असेल अशी माहिती व्यापारी बाळासाहेब बडदे यांनी दिली.

**मटारचे उत्पादन कमीच**

एपीएमसीत डिसेंबर महिन्यात मोठ्या प्रमाणात हिरवा वाटाणा दाखल होण्यास सुरुवात होत असते, शिवाय डिसेंबरमध्ये वाटण्याचा खरा हंगाम सुरु होतो तर वर्षभर तुरळक वाटाणा दाखल होत असतो. बाजार समितीत राज्यातील आणि मध्य प्रदेशातून मटारची आवक होते. मात्र सध्या परतीच्या पावसामुळे वाटणाच्या उत्पादनाला फटका बसला आहे. त्यामुळे बाजारात आवक कमीच आहे.

## वेचक

### 'कोणतीही संस्था एका रात्रीत उभी राहू शकत नाही'

**डोंबिवली :** कुठलीही संस्था एका रात्रीत उभी राहू शकत नाही तसेच कुठल्याही एका माणसांमुळे उभी राहू शकत नाही. त्यासाठी अनेकांचे सहकार्य लाभले पाहिजे. तसेच सर्व सभासदांना संस्थेच्या कार्यात सातत्याने काम करावे लागते, तेव्हा कुठे संस्था नावारूपाला येते असे प्रतिपादन सुप्रसिद्ध आर्किटेक्ट केशव चिकोडी यांनी केले. दि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट या संस्थेच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त कल्याण-डोंबिवली सेंटरच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीला माजी अध्यक्ष शरद जोगळेकर व सभासद हेमकांत भिसे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

### नेरुळमध्ये आज स्वामी समर्थांच्या पादुकांचे आगमन

**नवी मुंबई :** ब्रम्हांडनायक स्वामी समर्थ महाराज अक्कलकोट यांच्या चरण पादुकांचे आगमन आज नेरुळ गावात होणार आहे. स्वामी समर्थ महाराज पादुकाचे आगमन हा नेरुळ ग्रामस्थासाठी सुवर्णकांचन योग आहे. ज्या पादुकांच्या दर्शनासाठी अनेक कोस जावे लागते त्या ब्रम्हांडनायक स्वामी समर्थ महाराज यांच्या पादुकांचे दर्शन नेरुळ गावात भक्तगणांना होणार आहे. या सुवर्णक्षणांचे साक्षीदार भक्तगणांनी व्हावे असे भजनसेवक रामदास पाटील नेरुळकर यांनी म्हटले आहे.

### आशीर्वाद साहित्य पुरस्काराने रवींद्र माहिमकर सन्मानित

**भाईंदर (वार्ताहर) :** वंदना प्रकाशनतर्फे उत्कृष्ट वाङ्.मय निर्मितीसाठी देण्यात येणारा आशीर्वाद साहित्य पुरस्कार, साहित्यिक व ज्येष्ठ



सामाजिक कार्यकर्ते रवींद्र माहिमकर यांना त्यांच्या दृष्टा कर्मयोगी - नाना शंकरशेट (चरित्र) या ग्रंथाला मिळाला आहे. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू व माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर व अ. भा. मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी साहित्यिक राजीव श्रीखंडे, साहित्यिक डॉ. सुनील सावंत, हिंदी साहित्यिक डॉ. विरेंद्र प्रसाद सिंह आदी साहित्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### 'रिक्षाचालकांचे प्रलंबित प्रश्न विधानसभेत मांडणार'



**कल्याण :** कोकण विभाग रिक्षा-टॅक्सी महासंघाचे अध्यक्ष प्रणव पेणकर यांनी पदाधिकारी यांच्यासमवेत कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघात दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आलेल्या विश्वनाथ भोईर यांची भेट घेऊन अभिनंदन केले. यावेळी रिक्षा-टॅक्सी चालकांचे प्रलंबित प्रश्न अडीअडचणी सोडवण्याची ग्वाही आमदार विश्वनाथ भोईर यांनी उपस्थित पदाधिकारी यांना दिले. वाहतूक पोलिसांकडून फोटो शूट कारवाई पंधराशे रुपये दंड कमी करण्यासाठी विधानसभेत प्रश्न मांडणार असल्याचे आश्वासन आमदारांनी दिले. आमदारांच्या आश्वासनावर प्रणव पेणकर यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी संतोष नवले, जितेंद्र पवार, वसंत पाटील, विजय डफळ, बंडू वाडेकर, सुभाष चव्हाण, संजय बागवे, चंद्रकांत शिंदे आदी पदाधिकारी व रिक्षाचालक मालक उपस्थित होते.

## कल्याणमध्ये सापडले गुटख्याचे घबाड

**डोंबिवली (प्रतिनिधी) :**

तरूण पिढीला बरबादीच्या मार्गावर ओढणाऱ्या बदमाशांचे रॅकेट पोलिसांकडून उध्वस्त करण्यात आले आहे. कल्याण पश्चिमेतील भानूनगर परिसरात असलेल्या सोसायटीच्या तळमजल्यावरील गाळ्यांवर पोलिसांनी टाकलेल्या



धाडीत ६ लाख ६८ हजार रूपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला. या प्रकरणात गुटख्याची विक्री करणाऱ्या तीन जणांवर महात्मा फुले चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गाळ्यांमध्ये प्रतिबंधित गुटख्याची साठवण आणि तेथूनच वितरण करण्यात येत असल्याची माहिती मिळाल्यावर परिमंडळ ३ चे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या खास पथकासह महात्मा फुले चौक पोलिसांनी अचानक छापा टाकला.

## लोकार्पणाच्या प्रतीक्षेत काशिमिरा पोलीस चौकी

**भाईंदर (वार्ताहर) :**

काशिमिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मूनशी कंपाऊंड भागात गेल्या दोन वर्षांपासून तयार होऊन पडलेल्या पोलीस चौकीच्या लोकार्पणाला मुहूर्त सापडत नसल्याने बंद अवस्थेत असलेल्या चौकीचा उपयोग परिसरातील रहिवासी कपडे सुकविण्यासाठी करत आहेत.

मुनशी कंपाउंड परिसर संवेदनशील भाग असल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मीरा-भाईंदर महापालिकेच्या आरक्षित भूखंडावर नगरसेविका वीणा भोईर यांच्या नगरसेवक निधीतून सन २०२२ मध्ये पोलीस चौकीची निर्मिती करण्यात आली होती. यासाठी महापालिकेने नगरसेवक निधीतून ८ लाख रुपये खर्च केला. तसेच उर्वरित काही रक्कम सामान्य निधीचा वापर करून सदर पोलीस



चौकी तयार झाली आणि काही दिवसातच महापालिकेची मुद्दत संपुष्टात आली आणि प्रशासकीय राजवट लागू करण्यात आली. दरम्यानच्या काळात दोन आयुक्त तथा प्रशासक झाले. परंतु त्याचे लोकार्पण झाले नाही. महापालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासन दोघांनीही याचा गांभीर्याने विचार न केल्याने पोलीस चौकी तशीच पडून आहे. मध्यंतरी लोकसभा व त्यानंतर आता विधानसभा निवडणुक आचारसंहिताचे कारण पुढे केले जात होते. आता सर्व पार पडल्यावर तरी त्या पोलिस चौकीचे लोकार्पण व्हावे अशी परिसरातील नागरिकांची इच्छा आहे.

> काही तांत्रिक बाबींमुळे पोलीस चौकीचे लोकार्पण रखडले होते. आता लवकरच पोलीस चौकी कार्यान्वित होईल.
>
> **- एल.एम.तुरे**, वरिष्ठ पोलीस निरीक्षक (काशिमिरा पोलीस ठाणे)

## ठाणे जिल्ह्यात ४ वर्षांत रोखले ३९ 'बालविवाह'

**ठाणे (वार्ताहर) :**

मुलींचे लग्नाचे वय १८ वरून २१ करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. यासाठी प्रक्रियाही सुरु झाली आहे. असे असताना १८ वर्षाखालील मुला-मुलींचे विवाह मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे वास्तव पुढे येत आहे. ठाणे जिल्ह्यात मागील चार वर्षांत ३९ बालविवाह रोखण्यात पोलिसांसह महिला व बालविकास अधिकाऱ्यांना यश आले आहे. कोरोना काळामध्ये मुलींच्या आरोग्य, शिक्षण व हक्कांवर विविध प्रकारे गदा आणण्यात आली. मुलांना ऑनलाइन शिक्षणाचा पर्याय दिल्यानंतर शहरी व ग्रामीण भागामध्ये आर्थिक परिस्थिती नसलेल्या अनेक पालकांनी मुलांना शिक्षण देण्याचा पर्याय स्वीकारला आणि मुलींना घरकामासाठी जुंपण्यात आले किंवा त्यांचा विवाह लावून देण्यात आला. कोरोना काळामध्ये बालविवाह होण्याचे प्रमाण वाढल्याचे



दिसून आले.ठाणे जिल्ह्यात अजूनही बालविवाहाचे सत्र सुरूच आहे. २०२० ते २०२४ या कालावधीत ३९ बालविवाह रोखण्यात आल्याचे समोर आहे. बाल संरक्षण कक्ष, स्थानिक पोलिस, सामाजिक संस्था, महिला व बालविकास विभागाचे संरक्षण अधिकारी यांच्या माध्यमातून हे विवाह रोखण्यात यश आले आहे. सधन तालुक्यांमध्ये बालविवाहांचे प्रमाण चिंताजनक आहे. शहापूर आणि मुरबाड या आदिवासी तालुक्यांमध्ये बालविवाहाचे प्रमाण अधिक असून, बालविवाह रोखण्यासाठी सामाजिक संस्थांचीही मदत घेतली जात आहे. कोरोना काळामध्ये निर्माण झालेल्या समस्यांमध्ये आर्थिक टंचाई, मुलींवर लादण्यात आलेले विविध प्रकारचे निर्बंध, पैसे नसल्यामुळे मुलींची लग्न लावून जबाबदारीमधून सुटका करून घेण्याकडे असलेला कल, स्थलांतर अशा विविध कारणांमुळे बालविवाहांची संख्या वाढल्याचे दिसून आले. मात्र त्याचवेळी अवैधरित्या होणारे हे विवाह थांबावे व मुलींचे आयुष्य सुरक्षित राहावे यासाठी हेल्पलाइन, सामाजिक संस्था तसेच प्रशासन यांनी एकत्रितरित्या काम केल्याने बालविवाह रोखण्यात यश मिळाले, असे सामाजिक कार्यकर्ते सांगत आहेत.

**२०२० ते २०२४ मध्ये रोखलेले बालविवाह**

| वर्ष | रोखलेले बालविवाह |
|---|---|
| २०२० | ४ |
| २०२१ | ८ |
| २०२२ | ५ |
| २०२३ | ७ |
| २०२४ | १५ |
| **एकूण** | **३९** |

## दिल्ली येथील ट्रॅव्हल्स कंपनीला पुणे ग्राहक मंचाचा दणका

**कल्याण (प्रतिनिधी) :**

एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याची आर्थिक फसवणूक करणे दिल्ली येथील ट्रॅव्हल्स कंपनीला चांगलेच महागात पडले असून पुणे जिल्हा ग्राहक न्यायालयाने एक वर्षापूर्वी घेतलेली रक्कम २ लाख १५ हजार ५ टक्के व्याज दराने तक्रारदाराला परत करण्याचे आदेश पारित केले आहेत. या तक्रारदारांतर्फे ॲड. विजय काळे, ॲड. रूषीकेश काळे, ॲड. विश्वजित सुर्यवंशी, ॲड. तेजस माने, अँड. प्राजक्ता करडे, ॲड. सुशील गोरखे या वकिलांनी केसचे कामकाज पाहिले.

यबाबत सविस्तर वृत असे की, दिल्ली मधील एका टॅव्हल्स कंपनीने पुणे येथील पंचताराकीत हॉटेल मध्ये ग्राहकांची मिटींग आयोजित केली व संपूर्ण आशिया खंडामध्ये कोणत्याही देशात प्रवास करायचे आश्वासन दिले आणि त्यासाठी दोन लाख पंधरा हजार रुपये तक्रारदारकडून घेण्यात आले. प्रत्यक्षात तक्रारदारांनी नियम व अटीशर्तीप्रमाणे आशिया खंडातील इंडोनेशिया मध्ये जायचे निश्चित केले व त्यानंतर कंपनीला संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु, कंपनीच्या पदधिकाऱ्यांकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याने तक्रारदारांनी अँड विजय काळे, यांच्यातर्फे पुणे ग्राहक न्यायालयात धाव घेतली व याचिका दाखल केली.



टॅव्हल्स कंपनीतर्फे ग्राहक आयोगासमोरील सुनावणी दरम्यान गैरहजर राहिल्याने ग्राहक आयोगाने अँड. विजय काळे, यांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य केला व कंपनीला एकुण रु. २ लाख १५ हजार रुपये अदा केले असल्याचे दिसत असले तरी तक्रारदार यांनी त्याच्या तक्रार अर्जातील विनंती कलम मध्ये २ लाख १६ हजार रुपयांची मागणी केलेली दिसून येत आहे. तसेच कंपनीने ही रक्कम स्वीकारून तक्रारदार यांना कबुल केल्याप्रमाणे व तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे सेवा दिली नसल्याचे व तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे कुठलीही सेवा दिली नसल्याचे स्पष्ट झाले.

त्यामुळे कंपनीने तक्रारदारांना २ लाख १५ हजार रुपये मानसिक व शारिरीक त्रासापोटी व नुकसान भरपाई एकत्रित रित्या रक्कम १० हजार, तक्रार अर्जाचा खर्च रक्कम ५ हजार ४५ दिवसांत जमा करण्याचे आदेश ग्राहक न्यायालयाने दिले. ४५ दिवसांत या आदेशाची पुर्तता केली नाही तर ७% व्याज दराने परतावा करण्याचा आदेश ग्राहक न्यायालयाने पारित केला आहे.

## ठाण्यात गावठी हातबॉम्बचा साठा जप्त

**ठाणे :** ठाणे शहरात गावठी हात बॉम्बचा साठा पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी रायगड येथील माणगाव भागातील एका तरूणाला ताब्यात घेतले असून पोलिसांनी त्याच्याकडून १० हात बॉम्ब जप्त केले आहेत. त्याच्या इतर साथिदारांचा पोलीस शोध घेत आहेत. हे गावठी हात बॉम्ब रान डुकरांच्या शिकारीसाठी वापरले जात असल्याचे पोलिसांनी सांगितले. साकेत रोड परिसरात एकजण गावठी हात बॉम्ब घेऊन येत असल्याची माहिती ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय शिंदे यांच्या पथकाने सापळा रचला.



देवाभाऊ... मुख्यमंत्री, कल्याण पूर्वेत भाजपाचा जल्लोष!

## आसनगाव - कसारा लोकलकडे रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष

**शहापूर (वार्ताहर) :**



गेल्या अनेक वर्षांपासून आसनगाव व कसारा लोकल फेऱ्यांमध्ये वाढ न करणाऱ्या मध्यरेल्वे प्रशासनाने यंदा ही आसनगाव - कसाऱ्याला सापत्न वागणूक देऊन प्रवाशांच्या संतापात भर घातली आहे. नुकत्याच प्रसिद्ध करण्यात आलेल्या वेळापत्रकात आसनगाव व कसाऱ्याकडे जाणाऱ्या लोकलफेऱ्यांमध्ये देखील वाढ करण्यात आली नसल्याने मध्यरेल्वे प्रशासना विरोधात प्रवाशांमध्ये कमालीचा असंतोष पसरला असून पीक अवर्स मध्ये प्रवाशांना अक्षरशः दरवाजाला लटकत जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. तसेच आसनगाव - कसारा लोकलफेऱ्यांमध्ये वाढ न करणाऱ्या मध्यरेल्वे प्रशासनाने चाकरमानी प्रवाशांच्या तोंडाला पाने पुसल्याने तीव्र असंतोष पसरला असताना त्यातच भरीसभर म्हणून सध्या सुरू असलेल्या लोकलफेऱ्यांमध्ये वंदेभारत व अन्य एक्सप्रेसचा अडथळा होत असल्याने लोकल उशिराने धावत असून फास्ट लोकल्स स्लो मार्गावरून चालवण्यात येत आहेत. त्यामुळे चाकरमानी प्रवाशांना दररोजच लेटमार्कचा शेरा मिळत असल्याने त्रस्त झाले आहेत. मध्यरेल्वेच्या या भोंगळ कारभाराबाबत प्रशासनाचे वारंवार लक्ष वेधुनही त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करणाऱ्या रेल्वे प्रशासनाविरोधात संतप्त चाकरमानी प्रवाशांकडून व्यक्त केला जात आहे. त्याचप्रमाणे आसनगाव स्थानकात अर्धवट स्थितीत असलेला होमप्लॅटफॉर्मचे तत्काळ काम सुरू करणे, कसारा दिशेकडील २०१८ ला तोडलेला अतिमहत्वाचा पादचारी पूल बांधणे, पूर्व-पश्चिम वाहतुकीचा उड्डाणपूल मंजूर करणे, आटगाव स्थानकात जुन्या पडक्या पादचारी पुलावरील तिकीट ऑफिसचे प्रवाशांच्या सोयीनुसार व्यवस्थापन करणे, खडावली स्थानकात आसनगाव दिशेला पादचारी पुलाची उपाययोजना करणे, लोकलमध्ये प्रथम श्रेणी डब्यात तिकीट तपासणी योग्य रीतीने आणि नियमित करणे यांसह प्रवाशांना भेडसावणाऱ्या अनेक समस्यांबाबत कार्यवाही करत या समस्या दूर कराव्या अशी मागणी कल्याण - कसारा रेल्वे पॅसेंजर वेल्फेअर असोसिएशनतर्फे उमेश विशे यांनी केली आहे.

### कृषी विज्ञान केंद्रात रोटरीने युवकांना उद्योगाचे दिले प्रशिक्षण

# ठाणे जिल्ह्यातील तरुणांना बारामतीमध्ये मिळाला उद्योगमंत्र !

**ठाणे (प्रतिनिधी) :**

शाश्वत नोकरी मिळण्याची कोणतीच खात्री नसली तरी स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरू करण्याच्या दृष्टीने इम्पॅक्ट ॲकॅडमी फॉर स्किल डेव्हलपमेंट, ठाणे आणि रोटरी क्लब ऑफ ठाणे हिरानंदानी लिजंड्स यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे जिल्ह्यातील तरुणांना बारामती येथील कृषी विज्ञान केंद्रात नेऊन बेकरी उत्पादने, लाडू, चिवडा, चकल्या, ढोकळा, बिर्याणी यांची प्रात्यक्षिक शिकवून व्यवसायासाठी प्रेरित केले. तरुणांनी नोकरीच्या मागे न धावता



उद्योग व्यवसाय सुरू करण्याचे सल्ले दिले जातात.

मात्र सल्ला न देता प्रत्यक्षात व्यवसाय उद्योग कृतीत उतरवला आहे. ठाणे जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भाग त्याचप्रमाणे ग्रामीण शहरी भागातील तरुणांना व्यवसाय करण्यासाठी रोटरी क्लब प्रवृत्त करत आहे. यासाठी बारामती मधील कृषी विज्ञान केंद्रात युवकांना नेऊन नवनवीन उद्योगाचे धडे दिले असल्याची माहिती मुख्य होस्ट क्लब, ठाणे हिरानंदानी लिजंड्सचे अध्यक्ष निलेश दहीफुले यांनी दिली.

या प्रकल्पामध्ये सहभागी झालेल्या युवक-युवतींना मिलेट्सचे महत्त्व आणि त्यांचे पोषणमूल्य आपल्या आरोग्यासाठी कसे लाभदायक आहे, याची माहिती देण्यात आली.

तीनदिवसीय शिबिरात बेकरी उत्पादने, लाडू, चिवडा, चकल्या, ढोकळ्याचे प्रिमिक्स, डोसा, थालीपीठ यांसारख्या विविध पदार्थांची माहिती आणि रेसिपी शिकवण्यात आल्या. याशिवाय बिर्याणी आणि खीरसुद्धा प्रात्यक्षिकाद्वारे दाखवण्यात आले असल्याचे इम्पॅक्ट ॲकॅडमी फॉर स्किल डेव्हलपमेंट संस्थापिका मनीषा कोंडसकर यांनी सांगितले.

> महाराष्ट्रातील कृषी क्षेत्र उन्नत करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) उपयोग कसा करता येईल, त्याचबरोबर कृषी आणि अन्नप्रक्रिया उद्योग, शेळीपालन, दुग्धजन्य उत्पादने तसेच फळे आणि भाजीपाला प्रक्रिया उद्योग कसे उभारायचे, याबद्दल माहिती तरुणांना देण्यात आली.
>
> **- निलेश दहीफुले**, (अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ ठाणे हिरानंदानी लिजंड)



देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी निवड झाल्याने भाजपाचा ठाण्यात आनंदोत्सव.

**सुविचार** - प्रत्येक दिवस नवीन आव्हानांसाठी सज्ज असतो.

## ते पुन्हा येणार...!

२०१९च्या विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान 'मी पुन्हा येईन' असा दृढ आत्मविश्वास व्यक्त करणाऱ्या देवेंद्र फडणवीसांना खऱ्या अर्थाने पुन्हा येण्यासाठी तब्बल पाच वर्षे प्रतीक्षा करावी लागली. त्या दरम्यानच्या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. महाराष्ट्राच्या राजकारणाने असंख्य वेडीवाकडी वळणे घेतली. खरेतर २०१९ मध्येच त्यावेळी बोलल्याप्रमाणे फडणवीस परत आले असते; परंतु त्यावेळी त्यांना राजकारणाने आपले रंग दाखविले. त्या निवडणुकीत भाजप-सेना युती एकत्रितपणे निवडणुकीला सामोरे गेली होती आणि या युतीला स्पष्ट बहुमत प्राप्त झाले होते; परंतु उद्धव ठाकरेंचा मुख्यमंत्री पदाचा आग्रह भाजपने मान्य केला नाही, परिणामी उद्धव ठाकरेंनी थेट आपल्या राजकीय विरोधकांशी संधान साधले. त्यावेळी उद्धव ठाकरेंना प्रतिशह देण्यासाठी फडणवीसांनी राष्ट्रवादी काँग्रेससोबत संधान साधले आणि त्यादरम्यानच्या नाट्यमय घडामोडीत फडणवीसांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली; परंतु त्यांचे हे पुन्हा येणे औटघटकेचे ठरले. अवघ्या ७२ तासांत त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली महाआघाडीचे सरकार स्थापन झाले आणि मुख्यमंत्री पदाच्या प्रतीक्षेत असलेल्या देवेंद्र फडणवीस यांना विरोधी पक्षनेता पद स्वीकारावे लागले. या काळात 'मी पुन्हा येईन' हा टिंगलीचा विषय झाला होता. पुढे अडीच वर्षांनी फडणवीसांनी शिवसेनाच फोडली आणि आपला राजकीय हिशेब चुकता केला. त्यावेळीदेखील फडणवीस मुख्यमंत्री होतील अशी अपेक्षा होती; परंतु भाजपने अचानक एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपद दिले. एकनाथ शिंदे यांच्या हाताखाली उपमुख्यमंत्री म्हणून काम करणे फडणवीस यांना मान्य नव्हते; परंतु भाजप नेतृत्वाने त्यांना हे पद स्वीकारण्यात बाध्य केले. नंतरच्या काळात अजित पवारदेखील आपल्या समर्थक आमदारांसह सरकारमध्ये सामील झाले आणि आधीची युती आता महायुती झाली. या महायुतीला लोकसभा निवडणुकीत मात्र दणकून पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे पुढे होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महायुतीचे काय होईल याची चिंता महायुतीच्या सगळ्याच नेत्यांना लागली. लोकसभा निवडणुकीतील निराशाजनक कामगिरीची जबाबदारी देवेंद्र फडणवीसांनी स्वीकारली; परंतु पक्षाने त्यांच्यावरच पुन्हा एकदा विधानसभा निवडणुकीचे जबाबदारी सोपवली. या संदर्भातले सगळे अधिकार फडणवीस यांना बहाल करण्यात आले. या विधानसभा निवडणुकीत महायुतीचे नेतृत्व मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांच्याकडे असले तरी या निवडणुकीची सगळी सूत्रे खऱ्या अर्थाने फडणवीसांकडेच होती. त्यांनी आपले कौशल्य पणाला लावले. उमेदवार निवडीपासून ते प्रचार नियोजनापर्यंत सगळ्याच गोष्टीत त्यांनी बारीक लक्ष घातले. त्यांची ही मेहनत सार्थकी लागली. विधानसभा निवडणुकीत महायुतीला न भूतो न भविष्यती असा विजय मिळाला. देवेंद्र फडणवीस या प्रचंड मोठ्या विजयाचे शिल्पकार ठरले; परंतु इतका मोठा विजय प्राप्त केल्यानंतरही मुख्यमंत्री पदाची माळ फडणवीसांच्याच गळ्यात पडेल याची शाश्वती नव्हती. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री पदाचा दावा सहजासहजी सोडायला तयार नव्हते; परंतु भाजप नेतृत्वाने त्यांना यावेळी मुख्यमंत्री भाजपचाच असेल असे निक्षून सांगितले आणि तो एक अडसर दूर झाला. अर्थात फडणवीसांच्या स्वप्नपूर्तीत तेवढाच एक अडसर नव्हता. राज्यात पुढे होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि मराठा समाजाचे संभाव्य आंदोलन वगैरे मुद्दे समोर करून फडणवीसांऐवजी अन्य एखादा चेहरा मुख्यमंत्री म्हणून समोर करावा असाही एक मतप्रवाह पक्षात निर्माण झाला; परंतु फडणवीस यांचे संघाशी असलेले घनिष्ट संबंध आणि मोदींचा त्यांच्यावर असलेला विश्वास शेवटी या सगळ्या अडसरांवर मात करण्यास पुरेसा ठरला. या सगळ्या घालमेलित आठ नऊ दिवस निघून गेल्यावर शेवटी देवेंद्र फडणवीस यांची भाजप विधिमंडळ पक्षाचा गटनेता म्हणून एकमताने निवड झाली. गुरुवारी देवेंद्र फडणवीस पंतप्रधान आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री पदाची तिसऱ्यांदा शपथ घेतील आणि मुख्यमंत्रिपदावर त्याच ताकदीने पुन्हा येण्याचे त्यांचे स्वप्न अखेर पाच वर्षांनी पूर्ण होईल.


## अडथळ्याची शर्यत....!

सरकार स्थापन करण्यासाठी राज्यपालांना निवेदन दिल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत महायुतीचे तिन्ही मुख्य नेते हे दिलखुलास दिसले असले तरी मंत्रिमंडळ स्थापन करताना या तिन्ही नेत्यांची कसोटी लागणार आहे. या सरकारवर भाजपचा वरचष्मा राहणार हे स्पष्ट आहे. बहुतेक महत्त्वाची खाती भाजपकडे असतील. गृहमंत्रिपदसुद्धा भाजप आपल्याकडेच ठेवून घेण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे उर्वरित खात्यांसाठी शिंदे आणि पवार गटांमध्ये चढाओढ राहील. त्यातच भाजपने मंत्रिमंडळात मेरिटवर मंत्र्यांना स्थान द्यावे असा आग्रह धरला आहे. मेरिटवर याचा अर्थ यापूर्वीच्या मंत्रिमंडळात ज्यांची कारकीर्द वादग्रस्त ठरली किंवा ज्यांच्या बेताल विधानांमुळे नेत्यांसमोर अडचणी उभ्या ठाकल्या, आपल्या खात्याचा कारभार ज्यांना व्यवस्थित सांभाळता आला नाही अशा सर्वाधिक महत्त्वाचे म्हणजे ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत अशा लोकांना मंत्रिमंडळात स्थान नसावे, हा भाजपचा आग्रह दिसतो. भाजपने आपला हा आग्रह अधिक ताणून धरला तर शिंदे आणि पवार या दोघांचीही आपापले मंत्री निवडताना कसोटी लागणार आहे. त्यामुळेच नव्या मुख्यमंत्र्यांबरोबर शपथ घेणाऱ्या मंत्र्यांच्या नावांवरून कोंडी कायम आहे. विशेष म्हणजे शिवसेनेने दिलेल्या आपल्या संभाव्य मंत्र्यांच्या नावांपैकी काहींचा मंत्रिमंडळात समावेश करण्यास भाजपने साफ नकार दिल्याची बातमी आहे. या पृष्ठभूमीवर आमच्या मंत्र्यांची नावेही भाजपच ठरवणार का, असा संतप्त सवाल शिंदे गटातून उपस्थित होत आहे. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात या मुद्यावर चर्चा झाल्याचेही समजते. राष्ट्रवादीच्या बाबतीतही भाजपची हीच भूमिका आहे का, असा प्रश्न शिंदे सेनेकडून विचारला जात आहे. राष्ट्रवादीकडून जी नावे समोर केली जाण्याची शक्यता आहे त्यापैकी काही बड्या नावांवरही त्यामुळे प्रश्नचिन्ह लागू शकते. दुसरीकडे शिंदे आणि पवारांसाठी ही एक चांगली सोयदेखील आहे. भाजपचे नाव समोर करून मंत्री म्हणून त्यांना नको असलेल्या मंडळींचा पत्ता ते कट करू शकतात, अर्थात या सगळ्या नाराजांची समजूत काढणे ही सोपी गोष्ट नक्कीच नाही.

---

स्टेट लाइन

# काँग्रेसच्या पराभवाची मालिका



डॉ. सुकृत खांडेकर
9594224000

हरियाणाच्या पराभवातून काँग्रेसने कोणताही बोध घेतला नाही, हे महाराष्ट्राच्या निकालाने दाखवून दिले. हरियाणात काँग्रेसने चुकीचे उमेदवार निवडले होते, तसेच महाराष्ट्रात घडले. हरियाणात प्रदेश काँग्रेसचे नेते आपण सत्तेवर येणारच असे गृहीत धरून वागत होते, तसेच महाराष्ट्रातही प्रदेश नेते अहंकारात दंग होते. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी 'बटेंगे तो कटेंगे' या दिलेल्या घोषणेला आक्षेप घेण्यातच काँग्रेस गुंतून राहिली; पण मोदींनी दिलेल्या 'एक है तो सेफ है', या घोषणेने मतदारांवर जादू केली हे काँग्रेसला समजलेच नाही.

या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे देशभरातून शंभर खासदार निवडून आले. सोनिया गांधींची कन्या व राहुल गांधींची बहीण प्रियंका गांधी वड्रा यासुद्धा केरळमधील वायनाड मतदारसंघातून साडेचार लाखांचे मताधिक्य घेऊन लोकसभेवर निवडून आल्या. गांधी घराण्यातील आता हे तिघेहीजण संसदेत विरोधी बाकांवर आहेत. लोकसभेत गेली दहा वर्षे कोणी विरोधी पक्षनेता नव्हता. विरोधी पक्षनेता म्हणून पक्षाला सभागृहाच्या एकूण संख्येच्या किमान दहा टक्के संख्याबळ लागते ते काँग्रेसकडे दोन टर्म नव्हते. आता राहुल गांधी यांच्याकडे विरोधी पक्षनेते पद चालून आले आहे; पण ते खरोखरच या पदाला न्याय देतात का, पक्षाचा विस्तार व्हावा यासाठी त्यांचे नेतृत्व पुरेसे पडते का, चार राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी काही बोध घेणार आहेत का, हा कळीचा मुद्दा आहे.

एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली भाजपाची रणनीती विविध राज्यांत यशस्वी होताना दिसत आहे व दुसरीकडे राहुल गांधी व मल्लिकार्जुन खर्गे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष सातत्याने कमजोर होताना दिसतो आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष भाजपाला टक्कर देऊ शकत नाही हे जम्मू-काश्मीर, हरियाणा, झारखंड व महाराष्ट्र या राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत स्पष्ट झाले आहे. राहुल यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्ष भाजपाला देशात आव्हान देऊ शकत नाही आणि राज्याराज्यांत स्थानिक मुद्द्यांवर आवाजही उठवत नाही. राहुल गांधी लोकसभेचे विरोधी पक्षनेते झाल्यापासून काँग्रेस पक्षाला उत्साह प्राप्त होणे साहजिक आहे; पण ते केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदींवर संसदेत आणि संसदेबाहेर हल्ले करीत राहतात. लोकसभा आणि राज्यसभेचे दैनंदिन कामकाज बंद पाडणे यात काही मर्दुमकी नव्हे. लोकांचे प्रश्न मांडण्याऐवजी कॉर्पोरेट समूहांच्या उद्योगपतींवर रोज प्रहार करणे म्हणजे विरोधी पक्ष शक्तिमान आहे, असे नाही. गेली दहा वर्षे राहुल गांधी कॉर्पोरेटमधील भ्रष्टाचार हा विषय घेऊन मोदी सरकारला घेरण्याचा प्रयत्न करीत आहेत; पण त्यामागे भक्कम पुरावे नाहीत, केवळ हवेत बाण मारले जात आहेत. अमेरिकेतील न्यायालयाने गौतम अदानींना नोटीस काढली या मुद्यावरून राहुल गांधी संसदेत व बाहेर सरकारला जाब विचारत आहेत. अजून अदानी जेलबाहेर कसे, असा त्यांनी प्रश्न विचारला. मुळात अदानी यांना देशातील किंवा विदेशातील कोणत्याही न्यायालयाने दोषी ठरवलेले नाही, त्यांना सजा सुनावलेली नाही, मग राहुल आणि काँग्रेस पक्ष त्यांच्या विरोधात थयथयाट का करीत आहेत? भाजपा विरोधात स्थापन झालेल्या इंडिया आघाडीत डझनावारी प्रादेशिक पक्ष आहेत, त्यांना अदानींच्या विरोधातील काँग्रेसची भूमिका मान्य आहे का, याचाही राहुल व खर्गे विचार करीत नाहीत. महाराष्ट्रात तर अदानींच्या विरोधात केवळ उबाठा सेना व काँग्रेस रान उठवत आहे; पण महाआघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार हे वेगळी भूमिका मांडताना दिसत आहेत.

आपल्या मित्रपक्षांना कमी लेखून काँग्रेस मुळीच मजबूत होणार नाही. ओडिसामध्ये काँग्रेस पक्ष संपल्यातच जमा आहे. एकेकाळी इशान्येकडील राज्ये म्हणजे काँग्रेसचा गड होता, आता या गडावर सर्वत्र भाजपाचे किल्लेदार राज्य करताना दिसत आहेत. प्रत्येक राज्यात निवडणूक लढवताना भाजपाची रणनीती वेगळी असते. स्थानिक मुद्दे व स्थानिक नेते यांना महत्त्व दिले जाते, स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते यांना महत्त्व देऊन त्यांना योग्य दिशा दाखवली जाते. मोदींची सर्वत्र भाषणे होतात; पण त्या राज्यांचा इतिहास, भूगोल, राजकीय परिस्थिती याचा ते अभ्यास करून बोलतात. राहुल गांधी वगळता काँग्रेसकडे सर्व राज्यांत फिरणारे राष्ट्रीय नेते आहेत तरी कोण? निवडणुका आल्या की काँग्रेस कार्यकर्ते एकत्र दिसतात; पण तेही सत्तेसाठी जमतात. भाजपाचे केडर वर्षभर कार्यरत असते. भाजपाच्या पाठीशी संघाच्या निःस्वार्थी स्वयंसेवकांची फौज उभी असते. तसे काँग्रेसच्या मागे सेवादल, महिला, युवक, विद्यार्थी किंवा अन्य आघाड्यांची फौज राबताना दिसत नाही. सन २०१४ मध्ये काँग्रेसचे लोकसभेत ४४ खासदार निवडून आले, २०१९ मध्ये ५२ खासदार विजयी झाले; पण या दोन पराभवांपासून काँग्रेसने बोध घेतला नाही. आता काँग्रेसचे १०० खासदार लोकसभेत आहेत. काँग्रेसचे पुनरुज्जीवन होते असे वाटत असतानाच महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड व जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेसला पाठोपाठ मोठा पराभव पत्करावा लागला. एकीकडे राहुल गांधी संसदेत मोदी सरकारवर रोज हल्लाबोल करीत आहेत; पण राज्याराज्यांत काँग्रेसचा पराभव होतो आहे.


महाराष्ट्रात काँग्रेस, ठाकरेंची उबाठा सेना, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांनी महाआघाडी बॅनरखाली एकत्र येऊन विधानसभा निवडणूक लढवली. काँग्रेसने सर्वाधिक १०१ जागा लढवल्या. प्रत्यक्षात काँग्रेसचे केवळ १६ आमदार निवडून आले. विधानसभेच्या इतिहासात काँग्रेसच्या आमदारांची एवढी कमी संख्या प्रथमच असावी. सहा महिन्यांपूर्वी याच राज्यातील मतदारांनी काँग्रेसचे १३ खासदार लोकसभेवर निवडून पाठवले होते; पण विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला साफ नाकारले. हरियाणाच्या पराभवातून काँग्रेसने कोणताही बोध घेतला नाही, हे महाराष्ट्राच्या निकालाने दाखवून दिले. हरियाणात काँग्रेसने चुकीचे उमेदवार निवडले होते, तसेच महाराष्ट्रात घडले. हरियाणात प्रदेश काँग्रेसचे नेते आपण सत्तेवर येणारच, असे गृहीत धरून वागत होते तसेच महाराष्ट्रातही प्रदेश नेते अहंकारात दंग होते. काँग्रेसने आपला किंवा महाआघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा निवडणुकीत जाहीर केला नव्हता. दुसरीकडे काँग्रेससह महाआघाडीतील अनेक नेत्यांची नावे भावी मुख्यमंत्री म्हणून मीडियातून झळकत राहिली.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी 'बटेंगे तो कटेंगे' या दिलेल्या घोषणेला आक्षेप घेण्यातच काँग्रेस गुंतून राहिली; पण मोदींनी दिलेल्या 'एक है तो सेफ है', या घोषणेने मतदारांवर जादू केली हे काँग्रेसला समजलेच नाही. भाजपा व महायुतीकडे लाडकी बहीण योजना हा हुकमी एक्का होता, ओबीसींची व्होट बँक भाजपाकडे वळली, शेतकऱ्यांच्या मुद्यांवर भाजपाचे नेते सतत बोलत राहिले, हिंदू मतदारांना आकर्षित करणारी भाषणे व घोषणा भाजपा देत राहिली. त्याला प्रतिकार करायला काँग्रेस कमी पडलीच; पण मतदारांना आकर्षित करण्यासाठी काँग्रेसची झोळी रिकामी होती. आरक्षणाच्या मुद्यावरून मराठा-ओबीसी अंतर्विरोधाचा लाभही काँग्रेसला करून घेता आला नाही. संविधान व अदानी हे मुद्दे महाराष्ट्रात मतदारांना आकर्षित करू शकले नाहीत. लोकसभा व विधानसभा निवडणुकीची रणनीती वेगळी ठेवावी लागते, याचे भान काँग्रेसने ठेवले नाही. महाराष्ट्रात महाआघाडी व हरियाणात काँग्रेस सत्तेवर येईल असे वातावरण होते, सर्व एक्झिट पोल तशीच आकडेवारी देत होते. हरियाणात विधानसभेच्या ९० जागा आहेत, पैकी ४८ जागा भाजपाने जिंकून काँग्रेसला नामोहरम केले. महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागा आहेत, तेथे भाजपाने १३२ (महायुतीने २३५) जिंकून काँग्रेसची पुरती वाट लावली. हरियाणात अंतर्गत कलहामुळे काँग्रेसचे नुकसान झाले, तर महाराष्ट्रात काँग्रेसला ओव्हर कॉन्फिडन्स नडला. सत्ता नसेल, तर काँग्रेस खिळखिळी होते, हे महाराष्ट्रातल्या निकालाने दाखवून दिले.

---

दृष्टिक्षेप

# अदानी समूहाचा खोट्याचा व असत्याचा महापूर



लोकनाथ काळमेघ
9096494894

अदानी समूहावर अमेरिकेतील न्यायालयात आरोपपत्र दाखल झाले. खटला दाखल होऊन आता पंधरा दिवसांच्या वर कालावधी लोटून गेला, तरीही भारतात अजून एकसुद्धा एफआयआर दाखल झालेला नाही. सीबीआय आणि ईडीसारख्या गुन्हे अन्वेषण यंत्रणा मूग गिळून गप्प आहेत. संसदेत तर वेगळेच चित्र दिसते आहे. संसदीय समिती नेमणे राहिले दूर; पण लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सदनांमध्ये अदानी यांचे नाव घेणेसुद्धा अवघड झाले आहे. अदानी यांचे नाव कुणी विरोधी सदस्याने घेतले की, हे दोन्ही सभापती ते रेकॉर्डवरून काढून टाकण्याचा आदेश देतात.

बोफोर्स प्रकरणात स्वीडनच्या रेडिओवरून आरोप केले गेले होते. तेव्हा याच भाजपच्या नेत्यांनी केवढा हंगामा केला होता? आता तर अमेरिकेतील न्यायालयामध्ये सज्जड पुराव्यांनिशी आरोपपत्र दाखल केले गेले आहे. अमेरिकन न्यायालयात सादर केल्या गेलेल्या पुराव्यांना सज्जड अशासाठी म्हणायचे की, हे पुरावे ग्रँड ज्युरीच्या समोर सादर केले जातात आणि त्यांनी हे पुरावे सज्ज्ड आहेत असा निर्णय दिला, तरच आरोपपत्र दाखल केले जाते.

भारतात गुन्ह्याचा तपास करणारी यंत्रणा न्यायमूर्तींच्या समोर पुरावे सादर करते आणि ते पुरावे बघून न्यायमूर्ती आरोप-निश्चिती करतात. अमेरिकेत पुरावे न्यायमूर्तींऐवजी ग्रँड ज्युरीच्या समोर सादर केले जातात. ग्रँड ज्युरी म्हणजे सामान्य नागरिकांमधून निवडली गेलेली ज्यूरींची टीम. ती २३ सामान्य नागरिकांची बनलेली असते. आज एका उद्योगपतीवर लाचखोरी करून भारतीय जनतेचा पैसा लुबाडण्याचा आरोप होतो आहे आणि त्याचे नाव संसदेमध्ये उच्चारतासुद्धा येत नाहीय. चौकशी तर खूपच दूर राहिली! या मागचे कारण काय असावे बरे?


हिंडेनबर्ग रिसर्चचा रिपोर्ट २०२३च्या जानेवारीमध्ये आला. नुकतेच डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनले. अदानी आणि ट्रम्प यांचे संबंध 'चांगले' असल्याचे सांगितले जात आहे; परंतु यात गंमत अशी आहे की, ट्रम्प २०१६ ते २०२० या काळात अमेरिकेचे अध्यक्ष असताना खुद्द त्यांच्याविरुद्धच अनेक खटले अमेरिकन कोर्टांमध्ये दाखल केले गेले होते आणि चाललेसुद्धा होते. अमेरिकेत अध्यक्षापेक्षा कायद्याला आणि घटनेला मोठे स्थान आहे, असे चित्र यावरून आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. अशा अवस्थेत अध्यक्ष ट्रम्प आपला स्वतःचा जीव धोक्यात घालून अदानी यांना वाचवतात का, ते बघावे लागेल.

हे सर्व असे घडत असताना महेश जेठमलानी आणि मुकुल रोहतगी हे मोठे वकील रिंगणात उतरले. या दोघांचे म्हणणे असे की, अमेरिकी न्यायालयाने दाखल केलेल्या आरोपपत्रात 'सिक्युरिटीज् फ्रॉड'चा जो मुख्य आरोप आहे, त्यात गौतम अदानी आणि सागर अदानी यांची नावे नाहीत. स्टॉक मार्केटमध्ये अदानी समूहाचे २०-२० टक्क्यांनी पडलेले शेअर्स पाच-दहा टक्क्यांनी वर चढले. हे सगळे झाल्यावर सर्वोच्च न्यायालयाचे अजून एक मोठे वकील संजय हेगडे पुढे आले आणि त्यांनी सांगितले, की आरोपपत्राच्या ६७व्या परिच्छेदात गौतम अदानी आणि सागर अदानी यांचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे सिक्युरिटीज फ्रॉड साठीही ते दोषी धरले जाऊ शकतात. हा परिच्छेद समजून घेताना अमेरिकेतील कंपनी आणि अदानी ग्रीनमध्ये काय ठरले होते, ते समजून घेतले पाहिजे. या दोन कंपन्यांनी मिळून सेकीशी १२ गीगॅ वॅट सौर ऊर्जा विकण्याचा करार केला होता. त्यात अदानी ग्रीन ८ गीगॅ वॅट ऊर्जा विकणार होती आणि अमेरिकन कंपनी ४ गीगॅ वॅट ऊर्जा विकणार होती. पुढे एवढी महागडी ऊर्जा घेण्यासाठी राज्य सरकारांनी नकार दिला. म्हणून मग त्यांना लाच द्यायचे ठरले. ही लाच दोन हजार कोटी रुपयांची होती. एवढी मोठी लाच का तर त्यातून येत्या २० वर्षांत २५००० कोटी रुपयांचा वाढीव फायदा होणार होता. म्हणजे भारतीय जनता २५००० कोटी रुपयांना लुबाडली जाणार होती. यावर अदानी ग्रीनने अमेरिकेतील कंपनीला सांगितले की, एकूण ऊर्जेच्या एक तृतीयांश हिस्सा तुमचा आहे तेव्हा लाचेचा एक तृतीयांश भार तुम्ही उचलला पाहिजे. आता अमेरिकी गुंतवणूकदाराचा पैसा अमेरिकी कंपनीमध्ये लागलेला. त्यांना लाचेसारख्या अनैतिक गोष्टीसाठी उचलून पैसा देणे शक्य नव्हते. कारण तो सिक्युरिटीज फ्रॉड झाला असता. अमेरिकेतील गुंतवणूकदाराचा पैसा लाच वगैरे अनैतिक गोष्टींसाठी वापरायचा नाही, असा कायदा आहे. त्यावर अदानी ग्रीन म्हणाले की ठीक आहे, आम्ही हा पैसा देतो, त्या बदल्यात तुम्ही तुमचा ४ गीगॅ वॅटपैकी २.३ गीगॅ वॅटचा हिस्सा कमी करा आणि आम्हाला द्या. परिच्छेद ६७ या २.३ गीगॅ वॅटच्या ट्रान्सफरबद्दल बोलतो आहे. ही गोष्ट गौतम अदानी आणि सागर अदानी यांच्या देखरेखीखाली झाली, असे म्हणतो आहे. थोडक्यात, सिक्युरिटी फ्रॉडच्या आरोपाखाली गौतम अदानी आणि सागर अदानी यांचे नाव घेतले गेले आहे. अमेरिकेतील गुंतवणूकदारांचा पैसा लाच द्यायला वापरायचा नाही, असा सिक्युरिटीज फ्रॉड कायदा सांगतो. इथे पैसा नाही दिला, पण त्या बदल्यात अमेरिकन गुंतवणूकदाराच्या हक्काची ऊर्जा लाचेच्या पैशाऐवजी देऊन टाकली. म्हणजे नुकसान शेवटी अमेरिकन गुंतवणूकदाराच्या पैशाचेच झाले ना? तर आतापर्यंत सगळी परिस्थिती अशी झाली आहे. खोट्याचा आणि असत्याचा महापूर भारतात आला आहे का, याचा विचार करायचा आहे. स्वर्णिम यशाची नागरिकांना दाखवली जाणारी चित्रं खरी आहेत की, कोळ्याच्या चमकत्या जाळ्यासारखी ही चमकत्या नॅरेटिव्हजची केवळ जाळी आहेत, हे ठरवायचे आहे.

---

वास्तव

# वाढते रस्ते अपघात आणि गांभीर्यता



शशिकांत मधुकर तोटे
9130835458

देशात युद्ध, दहशतवाद आणि नक्षलवादापेक्षा रस्ते अपघातात जास्त मृत्यू होतात, असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी काही दिवसांपूर्वी व्यक्त केले होते. देशात प्रतिवर्षी पाच लाख रस्ते अपघात होतात. त्यामध्ये १.५ लाख लोकांचा मृत्यू होतो, तर ३ लाख लोकं अपघातात जखमी होतात. एका अहवालानुसार देशात प्रत्येक तासाला ५३ अपघात होतात. यात १९ लोकांचा मृत्यू होतो, तर काही जखमीसुद्धा होतात. एकूण रस्ता अपघातांच्या तुलनेत ८५ टक्के अपघात वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे होतात, तर १५ टक्के अपघात हे प्रशासनाच्या चुकांमुळे होतात. यामुळे देशात सकल राष्ट्रीय उत्पादनाचे (जीडीपी) ३ टक्के नुकसान होते. रस्ते अपघातात अशावेळी चालकच बेजबाबदार ठरतात असे नव्हे, तर रस्ता अभियांत्रिकीसुद्धा चुकल्याचे अनेक उदाहरणे देशात आहेत.

रस्ते अपघातांची असंख्य कारणे आहेत. बेलगाम वाहने चालविणे, निष्काळजीपणे वाहन चालविणे, मद्यप्राशन करून वाहन चालविणे, वाहतूक नियमांचे कुठलेही पालन न करणे. सध्या राज्यात बहुचर्चित असलेली 'हिट अँड रन' प्रकरणे त्याचीच उदाहरणे होत. रस्ते आणि वाहतूक मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार २०२२ मध्ये एकूण अपघातांपैकी ७२.३ टक्के अपघात वेगाने वाहन चालविण्याने झाले होते. लोक जखमी झाले आहेत. २०२१ च्या, वेगाने वाहन चालविण्याच्या घटनेची तुलना केल्यास एकूण अपघातांमध्ये १२.८ टक्के तर, मृत्यूमध्ये ११.८ टक्के आणि जखमींच्या संख्येत १५.२ टक्के एवढी वाढ झाली आहे. मागील आठवड्यात नागपूर जिल्ह्यातील

बोर अभयारण्याच्या सहलीसाठी जाणारी विद्यार्थ्यांची बस दरीत कोसळली होती. या अपघातात एका विद्यार्थिनीचा मृत्यू, तर अनेक विद्यार्थी जखमी झाले होते, तर दुसऱ्या मोठ्या एका दुर्घटनेत गोंदिया जिल्ह्यातील डव्वा गावाजवळ शिवशाही बस एका दुचाकीला ओव्हरटेक करण्याच्या नादात पलटली होती. या बसमधील अकरा प्रवासी ठार, तर १९ प्रवासी गंभीर जखमी झाले होते. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त करण्यात आली होती. क्षुल्लक कारणानेसुद्धा मोठे अपघात होतात हे शिवशाही बस दुर्घटनेतून व्यक्त होते. आज देशातील असंख्य मार्गांवर चुकीच्या दिशेने वाहन चालविणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यावर फारशी कडक कारवाई होताना दिसत नाही. परिणामी अपघातांची शक्यता अधिक बळावते.

दिवसेंदिवस वाढणारे अपघात कमी करण्यासाठी सरकार प्रयत्नशील दिसते; परंतु त्याची अंमलबजावणी त्वरित व्हायला हवी. वाढते रस्ते अपघात उपाययोजनेचा एक भाग म्हणून



स्टॉकहोम करारातील बांधीलकीनुसार सरकारने २०३० पर्यंत रस्त्यांवरील मृत्यू कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने '४ ई' म्हणजे एज्युकेशन (शिक्षण), इंजिनीयरिंग (अभियांत्रिकी), (रस्ते आणि वाहने दोन्ही) एन्फोर्समेंट (अंमलबजावणी) आणि इमर्जन्सी केअर (आपत्कालीन सेवा) असा दृष्टीकोन स्वीकारला आहे. अशा उपाययोजनेने रस्ते अपघात कमी होण्यास हातभार लागेल व मानवी प्राणहानी टळेल. अशी अपेक्षा बाळगू या.!

दारव्हा, जि. यवतमाळ

---

वाचक विचार मंच

## नद्या जोड प्रकल्प गरजेचा!

सध्या देशाच्या काही भागांत अतिवृष्टीने पूरग्रस्त, तर काही भागांत दुष्काळसदृश्य स्थिती पाहायला मिळत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नैसर्गिक आपत्तीला धोका निर्माण झाला आहे. त्यावर मात करण्यासाठी बहुचर्चित असा नदीजोड प्रकल्प अर्थात 'इंटरबेसिन वॉटर ट्रान्सफर' ही योजना भारत सरकारने राबविणे गरजेचे बनले आहे. जास्त पाणी असलेल्या नदीखोऱ्यातील पाणी कमी असलेल्या भागाकडे वळवणे महत्त्वाचे ठरेल. त्यासाठी अद्ययावत अभियांत्रिकी तंत्रज्ञान कौशल्याची आवश्यकता आहे. देशाचा ३५ टक्के भाग सर्वसाधारण दुष्काळप्रवण, तर आणखी ३३ टक्के भाग गंभीर दुष्काळप्रवण आहे. दुसऱ्या बाजूला उत्तर व पूर्व भागात वारंवार महापुराचे प्रश्न निर्माण होतात. यावर मात करण्यासाठी 'राष्ट्रीय नदी जोड प्रकल्प' हाच एक मार्ग आहे. यामुळे नदी जोड प्रकल्पाचे होणारे लाभ तर मिळतीलच शिवाय उत्तर व पूर्व भारतातील वार्षिक महापुराचे व त्याच्या दुष्परिणामांचे प्रश्न सोडविणे सोपे होईल. दक्षिण व पश्चिम भागातील पिण्याच्या पाण्याचा, शेतीसाठीच्या पाण्याचा प्रश्न सोडविता येईल. शहरी पाणीपुरवठ्याची व्यवस्था अधिक समाधानकारक करता येईल. हरितक्रांती मर्यादित न राहता, प्रादेशिक व पीक रचनेच्या दृष्टीने सर्वस्पर्शी व समावेशक होईल. देशाच्या काही भागांत बारमाही अंतर्गत जलवाहतूक सुरू होईल. हा प्रकल्प, त्याचे उपभाग, त्यासाठी गुंतवणूक, प्रेरित गुंतवणूक, परिणामी निर्माण होणारा रोजगार, त्याचे देशभर विकेंद्रीकरण या सर्व गोष्टी पुढच्या १५ ते २० वर्षे चालू राहतील. बांधकाम क्षेत्रातील तंत्रविज्ञान व व्यवस्थापनाचा एक नवा आदर्श निर्माण होईल.

**राजू जाधव**, मांगूर, जि. बेळगांव

## ..या मनोरंजनाची किती व कोणती किंमत मोजायची?

अलीकडच्या काळात धावपळीच्या जीवनात अगोदरच झोपेचे तास कमी होताना त्यात व्हॉट्सअप, फेसबुक, सोशल मीडियाचे अनेक ॲप यामुळे झोप येत असतानाही मोबाईल हातातून सुटत नाही. याचे दुष्परिणाम दिसत व जाणवत असतानाही मोबाईल पाहण्यावर नियंत्रण आणण्यासाठीचे प्रयत्न केले जात नाहीत. या मनोरंजनाची किती व कोणती किंमत मोजायची?

**प्र.मु.काळे**, सातपूर, नाशिक
मो. नं.: ९२७३०४५७९४

---

## 'देवा' 'शप्पथ'!

मतभेदांनी वाढले तिढे
सुरू झाले आढेवेढे
चर्चेचे अडले घोडे
अखेर सुटले कोडे

'दिल्लीने' हुकूम सोडला
घाला जन्माला सत्तेचे बाळ
'ताप-संताप' संपला
तेव्हा झाले सर्व मवाळ

विरोधक विचारायचे
केव्हा, कुठे अन् कधी?
'बावन'पत्त्यांची 'शपथ' घेऊन
म्हणाले पाच तारखेला 'विधी'

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

---

संवाद

## उत्तरेतील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यात कोणत्या अडचणी आहेत?


जुन्या भूसंपादन कायद्यानुसार शेतकऱ्यांना १० टक्के भूखंड आणि ६४.७ टक्के वाढीव मोबदला द्यावा, उच्चाधिकार समितीने मंजूर केलेल्या मुद्यांवर शासनानी आदेश काढावेत, भूमिहीन शेतकऱ्यांच्या मुलांना रोजगार व पुनर्वसनाचा लाभ द्यावा, वाढीव लोकसंख्येच्या क्षेत्राची नियमित तपासणी व विल्हेवाट लावावी आणि १ जानेवारी २०१४ नंतर संपादित केलेल्या जमिनीवर बाजारभावाच्या चौपट मोबदला आणि २० टक्के भूखंड द्यावा, अशा प्रमुख ५ मागण्यांसाठी उत्तरेतील नोएडा, ग्रेटर नोएडा आणि यमुना प्राधिकरणातील लाखांवर शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी दिल्लीकडे कूच केले आहे. गतवर्षीदेखील मोर्चांनी आलेल्या उत्तरेतील शेतकऱ्यांनी दिल्लीत दीर्घकाळ रस्त्यांवर ठाण मांडून त्यांचे आंदोलन सुरू ठेवले होते. आक्रमक पावित्र्यातील शेतकऱ्यांच्या आंदोलनाला तोंड देण्यासाठी दिल्लीतील प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली आहे. विशेषतः उत्तर प्रदेशातील २० जिल्ह्यांतील शेतकरी सुरक्षेसाठी लावलेले बॅरिकेड्स ओलांडून दिल्लीत पोहोचल्याने दिल्ली शहरात प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे. काही ठराविक काळानंतर शेतकऱ्यांकडून पुन्हा पुन्हा उगारल्या जाणाऱ्या आंदोलनाचा पवित्रा गांभीर्याने विचारात घेऊन त्यावर सन्माननीय तोडगा काढण्यासाठी सरकारने पुढाकार घेण्याची गरज आहे, असे वाटते. आगामी काळात पुन्हा पुन्हा त्याच मुद्यांवर आधारित आंदोलने न छेडण्याच्या अटींवर सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांवर चर्चा घडवून सुचविलेल्या तोडग्यांवर शेतकरी संघटना, किसान परिषद यांनी तडजोडी स्वीकारल्याशिवाय त्यांच्या समस्या सोडविल्या जातील असे वाटत नाही. आंदोलनादरम्यान शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांचे होणारे हाल, शेतकी उत्पादनांवर होणारे परिणाम, दिल्लीत वाहतूक कोंडीमुळे हैराण होणारे रहिवासी यांनी हे सारे किती काळ सहन करावे! दोनही बाजूंनी समोरासमोर बसून चर्चेने मार्ग काढण्याशिवाय अन्य पर्याय नाहीत, हे वास्तव समजावून घेतले पाहिजे. ताणून ठेवल्याने कोठल्याही समस्या सुटणार नाहीत याची जाणीव सर्वांनीच ठेवलेली बरी.

**राजन पांजरी**,
मुंबई, मो. नं.: ९८१९७००८१८

---

गुल्लेर

# कोनाले अटपत नाही



नरेंद्र इंगळे
9561226572

'एकतर मी बोलत नाही अन् बोलली तर कोनाले अटपत नाही आतेबाई..'

'म्या काय म्हतलं तुले?'

'तुम्ही शिलाजवळ माह्या चुगल्या केल्या.'

'काय बोलली मी?'

'तुम्हीच तर तिच्याजवळ म्हनलं की माह्या सुनीनं नवरा हातचा करुन ठेवला..'

'ठेवलाच मंग..मी काय खोटी बोलली? आगुदर लय चांगला होता माहा पोरगा.. तू आल्यापासून वारं पलटलं..'

'येलाले बेल लाऊ नका..लय कामं राह्यले..तुमचा हातभार कवडीचा नाही..मी बोलली की तुमाले राग येते..एकतर मी बोलत नाही अन् बोलली तर कोनाले अटपत नाही..'

'तूच दिवस निंगता भांडन उकरून काढून राह्यली.. मी तं मुकीच बसेल होती.'

'तुम्ही मुक्या बसता अन् जाग्यावर बसून काड्या करता..'

'मी खोटी बोलत नाही, आगुदर तो मले इचारे.. जेवली काय? तब्यत कशी आहे? आता तर काहीच विचारत नाही..आला की घुसला खोलीत..तुनं हाताखालचा केला त्याले..अलग राहाचा सल्ला देऊन राह्यली..'

'रोजच्या कटकटीपेक्षा अलग राहाले पुरते.'

'बरी आहेस व घरफोडी.. लोकं काय म्हणतील? म्हतारपनात येले करतं काय आमचे?'

'मंग मुकं राहावं.. शिल्लक कायले बोलता? कोनी आलं की माह्याच चुगल्या करता तुम्ही..सून अशीच आहे..तशीच आहे.. तिच्या बापानं काहीच केलं नाही..'

'काय केलं तुह्या बापानं? एक झोपाचा पलंग देला..त्याच्यावर दोघाईले झोपता येत नाही..एक टपराची आलमारी देली..''आता बोलाले लाऊ नका..एकतर मी बोलत नाही अन् बोलली तर कोनाले अटपत नाही..'

'काही सांगू नको.. माह्या पोराच्या पैशावर मजा करुन राह्यली तू.'

'तुमच्या पोराच्या पैशावर नाही.. दीड हजार रुपये मयना खनखन येऊन पडते माह्या खात्यात.. आता एकविसशे होऊन राह्यला. तुमाले त खळकू भेटत नाही. तंबाखूसाठी पाच रुपये मागा लागतात.' 'दीड टिकल्यावर लय तोंड करून राह्यली व? जसा काही म्या पैसा पाह्यलाच नाही. फुकटच्या पैशावर लय मज्जावली.'

# पीएफ न भरणाऱ्या आठ कंपन्यांवर कारवाई

**पणजी** : गेल्या वर्षी कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी न भरल्याबद्दल गोव्यातील आठ कंपन्यांवर कारवाई करण्यात आली आहे. महिना संपल्यानंतर १५ दिवसांच्या आत कर्मचाऱ्यांच्या पीएफ खात्यात रक्कम जमा न केल्याबद्दल या आस्थापनांवर कायदेशीर कारवाई करून त्यांना दंड ठोठावण्यात आल्याची माहिती केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयाने दिली आहे. केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्रालयाच्या अहवालानुसार, भविष्य निर्वाह निधी आणि विविध तरतुदी कायदा १९५२ अंतर्गत नोंदणीकृत आस्थापना तसेच मालकांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना चलन-कम-रिटर्न (इसीआर) द्वारे महिना संपल्यावर १५ दिवसांच्या आत पैसे देणे आवश्यक आहे. जर मालक इसीआरद्वारे रक्कम भरण्यात अयशस्वी झाल्यास, त्यांना एसएमएस किंवा ईमेलद्वारे थकबाकी भरण्याच्या सूचना पाठवल्या जातात.

# गोव्यात ७४,९९२ परप्रांतीय कामगारांची नोंद

## ई-श्रम पोर्टलवरील आकडेवारी

**पणजी** : राज्यात ७४,९९२ परप्रांतीय कामगारांची नोंद आहे. रोजगारासाठी विविध राज्यांतून गोव्यात आलेल्या कामगारांनी ई-श्रम पोर्टलवर केलेल्या नोंदणीतून ही आकडेवारी समोर आली आहे. जागतिक पर्यटनस्थळ असलेल्या गोव्यात दरवर्षी नोकरीच्या लाखो संधी उपलब्ध होत असतात. त्यामुळे विविध राज्यांतील कामगार वर्गाचे पाय गोव्याकडे वळत आहेत. या राज्यांतून दरवर्षी हजारो कामगार गोव्यात येतात. काही जण कायमचे स्थायिक होतात. तर,



काही जण केवळ कामासाठीच गोव्यात आलेले असतात. गोव्यात रोजगारासाठी आलेल्या परप्रांतीय कामगारांना ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करावी लागते. आतापर्यंत गोव्यात आलेल्या अशा ७४,९९२ कामगारांनी ई-पोर्टलवर नोंदणी केल्याचे या आकडेवारीतून दिसून येते.

# पाकमध्ये ९४ जणांविरोधात अटक वॉरंट जारी

## हिंसक आंदोलन प्रकरण

वृत्तसंस्था

**इस्लामाबाद** : पाकिस्तानातील दहशतवाद विरोधी न्यायालयाने माजी पंतप्रधान इम्रान खान आणि अन्य ९४ जणांविरोधात अजामीनपात्र अटक वॉरंट बजावले आहे. यामध्ये त्यांची पत्नी बुशरा बिबी आणि खैबर पख्तूनख्वाचे मुख्यमंत्री अली अमीन गंदापूर यांचाही समावेश आहे. इम्रान खान यांनी १३ नोव्हेंबरला पाक सरकारविरोधात निर्वाणीचा लढा देण्यासाठी जनतेला आंदोलनाचे आवाहन केले होते.

दिनांक २४ नोव्हेंबरला इस्लामाबादच्या डी-चौकात धरणे आंदोलनासाठी आलेल्या पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ पक्षाच्या हजारो कार्यकर्त्यांना पोलिसांनी बळाचा वापर करून हुसकावून लावले होते.



**पणजी** : तिसवाडी आगशी येथील प्राचीन गोपकापट्टणम बंदराचा सखोल अभ्यास केंद्रीय समितीकडून करण्यात येणार आहे. यासाठी हेरिटेज धोरण तयार केले जाणार आहे. बंदराच्या रेतीमध्ये अनेक रहस्ये दडलेली आहेत. तज्ज्ञांच्या मदतीने ती शोधणार आहोत, असे पुरातत्व खात्याचे मंत्री सुभाष फळदेसाई यांनी सांगितले.

# ब्लिडिंग आय विषाणूचा १७ देशांत फैलाव

## आजाराने घेतला १५ जणांचा बळी

**रवांडा** : आफ्रिकेतील रवांडा या देशात 'ब्लिडिंग आय' नावाच्या एका विषाणूची साथ पसरली असून या आजारामुळे आतापर्यंत १५ लोकांनी जीव गमावला आहे. गंभीर बाब म्हणजे आफ्रिकेतील १७ देशांत हा आजार पसरला आहे. यातील सर्वाधिक चिंतेची बाब अशी की या आजारामध्ये मृत्यू ओढवण्याची शक्यता ५० टक्के इतकी जास्त आहे, त्यामुळे पृथ्वीवरील माणसांना प्रादुर्भाव होत असलेल्या विषाणूंतील हा सर्वांत घातक विषाणू मानला जात आहे. या विषाणूचे नाव मारबर्ग असे आहे. हा आजार रवांडासह बुरांडी, सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक, काँगो, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो, गॅबॉन, केनया, युगांडा, बोलिव्हिया, ब्राझिल, क्युबा, डोमेनिकन रिपब्लिक, इक्वेडर, गयाना, पनामा आणि पेरू या देशात ही साथ पसरलेली आहे.

# तेलंगणामध्ये 5.3 तीव्रतेचा भूकंप

## २० वर्षानंतर बसला शक्तिशाली धक्का

**हैदराबाद** : तेलंगणातील मुलुगु जिल्ह्यात बुधवारी सकाळी ५.३ तीव्रतेचा भूकंप झाला, ज्याचे धक्के हैदराबाद आणि आंध्र प्रदेशच्या काही भागातही जाणवले. सकाळी ७.२७ वाजता भूकंप झाला, त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीने ही माहिती दिली आहे.

कोणतीही जीवितहानी किंवा मोठी हानी झाल्याचे तात्काळ वृत्त नाही. अधिकारी परिस्थितीचे मूल्यांकन करत आहेत, तर तज्ज्ञांनी रहिवाशांना भूकंपाच्या वेळी सतर्क राहण्याचा आणि गर्दीच्या किंवा असुरक्षित इमारतींपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे. तेलंगणा वेदरमॅन नावाच्या एका एक्स वापरकर्त्याने सांगितले की, गेल्या २० वर्षात पहिल्यांदाच तेलंगणाला सर्वात शक्तिशाली भूकंपाचा धक्का बसला असून त्याचा केंद्रबिंदू मुलुगुमध्ये ५.३ रिश्टर स्केलचा होता.



# बांगलादेश न्यायालयाने जामिनावरील सुनावणी पुढे ढकलली

# चिन्मय कृष्णा दास यांना वकील मिळेना

**ढाका** : बांगलादेशमध्ये अटकेत असलेले हिंदू नेते चिन्मय कृष्णा दास ब्रह्मचारी यांना न्यायालयाकडून दिलासा मिळाला नसून, चितगाव न्यायालयात त्यांच्या जामिनावर आता २ जानेवारी रोजी सुनावणी होणार आहे. दास यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे.

त्यांच्या वतीने बाजू मांडण्यासाठी कोणताही वकील पुढे येत नसल्याने न्यायालयाने जामिनावरील सुनावणी पुढे ढकलली. दास यांच्या जामीन अर्जावर न्यायालयात मंगळवारी सुनावणी होणार होती. मात्र, त्यांना न्यायालयात सुनावणीसाठी आणले नाही. सुनावणीवेळी चितगाव न्यायालयाबाहेर कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दास यांचे प्रतिनिधित्व करणारा कुठलाही वकील नसल्यामुळे सत्र न्यायाधीशांनी जामीन अर्जावरील निकालासाठी पुढील तारीख दिल्याची माहिती सरकारी वकिलांनी दिली. राजकीयदृष्ट्या प्रेरित वकिलांच्या गटांच्या धमक्यांमुळे दास यांना कुठलाही वकील मिळाला नसल्याचा दावा त्यांचे सहकारी स्वतंत्र गौरंग दास यांनी केला आहे.

## ब्रिटनकडून चिंता व्यक्त


**लंडन** : बांगलादेशमध्ये अल्पसंख्य हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारांवर आणि हिंदू नेत्याच्या अटकेवर ब्रिटनने चिंता व्यक्त केली. मजूर पक्षाचे खासदार बॅरी गार्डिनर यांनी याबाबत संसदेत प्रश्न उपस्थित केला. हिंद-प्रशांत भागासाठीच्या परराष्ट्र खात्याच्या मंत्री कॅथरिन वेस्ट यांनी सांगितले, की बांगलादेशमधील गेल्या महिन्यामधील भेटीत हंगामी सरकारने अल्पसंख्याकांसाठी मदत उपलब्ध असल्याची माहिती आपल्याला दिली आहे. ढाक्यामध्ये सर्वप्रथम येऊन प्रा. युनूस यांच्याशी ब्रिटनने संवाद साधला आणि अल्पसंख्याकांबरोबर असल्याचे कृतीद्वारे दाखवून दिले. बांगलादेशमधील परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहोत.

# कॅनडाने सरळ अमेरिकेचा 51 वा प्रांत बनावे!

## अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची प्रतिक्रिया

वृत्तसंस्था

**वॉशिंग्टन** : कॅनडाच्या अमेरिकेत खपणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के अतिरिक्त कर लावला जाईल, अशी घोषणा अमेरिकेचे भावी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केल्याने कॅनडाची अर्थव्यवस्था धोक्यात येणार आहे. हा निर्णय २० जानेवारीला ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यानंतर लागू होणार आहे. यामुळे चिंतीत झालेल्या कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रूडो यांनी ट्रम्प यांची काही दिवसांपूर्वी अमेरिकेत जाऊन भेट घेतली होती. हा निर्णय घेऊ नये, अशी विनंती त्यांनी ट्रम्पना केली होती. तथापि ट्रम्प यांनी ही विनंती मान्य करण्यास नकार दिल्याचे दिसून येत आहे. अमेरिकेने करात वाढ केल्यास कॅनडाची अर्थव्यवस्था मारली जाणार असेल, तर कॅनडाने सरळ अमेरिकेचा ५१ वा प्रांत बनावे. तसे केल्यास कर वाढविण्याचा प्रश्नच येणार नाही, अशी प्रतिक्रिया ट्रम्प यांनी व्यक्त केल्याचे वृत्त आहे. ट्रम्प



यांची भेट घेण्यासाठी ट्रूडो यांनी अचानकपणे मागच्या आठवड्यात अमेरिकेचा अनधिकृत दौरा केला होता. कॅनडाला अनेक वस्तूंसाठी अमेरिकेवर अवलंबून रहावे लागते. तसेच कॅनडात उत्पादित झालेल्या अनेक वस्तूही अमेरिकेच्या बाजारपेठेत खपत असतात. या वस्तूंवर अमेरिकेने कर वाढविल्यास कॅनडाची त्या देशाला होणारी निर्यात प्रभावित होणार आहे. त्यामुळे ट्रूडो यांची ही धडपड सुरू आहे. अमेरिका आणि कॅनडा यांच्यात हजारो किलोमीटर लांबीची सीमारेषा आहे. ही सीमारेषा बहुतेक स्थानी खुली असल्याने कॅनडातून अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर स्थलांतर होत असते. हे स्थलांतर कॅनडाने रोखावे, अशी ट्रम्प यांची मागणी आहे.

## वन्यजीव पुनर्वसन केंद्राच्या कामाला प्रारंभ

**बेळगाव** : भुतरामहट्टी येथे नव्याने उभारण्यात येत असलेल्या वन्यप्राणी पुनर्वसन केंद्राच्या कामाला प्रारंभ झाला आहे. या ठिकाणी अनाथ, आजारी व जखमी वन्यप्राण्यांना आसरा मिळणार आहे. शिवाय वन्य प्राण्यांवर योग्य ते उपचार करून देखभाल केली जाणार आहे. त्यामुळे आजारी व जखमी वन्यप्राण्यांचा देखभालीचा प्रश्न लवकरच मार्गी लावणार आहे.

# नामिबियाला ६४ वर्षांनंतर मिळाली महिला राष्ट्रपती!

वृत्तसंस्था

**नामिबिया**: आफ्रिकन देश नामिबियाच्या इतिहासात प्रथमच एक महिला राष्ट्राध्यक्ष बनली आहे. याआधी देशाचे उपराष्ट्रपती राहिलेल्या नेतुम्बो नंदी-नदैतवाह यांची पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून निवड झाली आहे. तो ऐंइ्ध पक्षाचा आहे. एक आईन्ग्रजी वर्तमानपत्राच्या अहवालानुसार, अधिकृत निकाल मंगळवारी सादर करण्यात आला, त्यानुसार ऐंइ्ध पक्षाला वैध मतांपैकी ५७ टक्के मते मिळाली, ज्याने अध्यक्ष होण्यासाठी आवश्यक ५० टक्के मतांचा अडथळा पार केला. नंदी-नडैतवाह यांनी पॅट्रियट्स फॉर चेंज (घ्झ्ण) च्या तिच्या जवळच्या प्रतिस्पर्धी पांडुलेनी इतुला यांचा पराभव करून दणदणीत विजय मिळवला, जिथे इतुला यांना केवळ २६ टक्के मते मिळाली.



नामिबियाला १९९० साली दक्षिण आफ्रिकेपासून स्वातंत्र्य मिळाले. तेव्हापासून नंदी-नडैतवाह राजकारणात सतत सक्रिय आहेत. मात्र, यावेळी अध्यक्षपदाची निवडणूक जिंकून त्यांनी पक्षाला अधिक मजबूत स्थितीत नेले आहे. निवडणुकीतील पराभवानंतर नदैतवाह यांचा विरोधी पक्ष आयपीसीने निवडणूक प्रक्रियेत हेराफेरीचा आरोप केला आहे.

# राष्ट्राध्यक्ष यून यांनी मार्शल लॉ केला रद्द!

वृत्तसंस्था

**सेऊल** : दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष यून सुक येओल यांनी अवघ्या २४ तासांत मार्शल लॉ लागू करण्याचा आदेश मागे घेतला आहे. कोरिया वर्तमानपत्राच्या वृत्तानुसार, देशातील प्रचंड निदर्शने आणि जनक्षोभ पाहता राष्ट्रपतींनी बुधवारी सकाळी आपला आदेश मागे घेतला आणि नॅशनल असेंब्लीची विनंती मान्य केली. त्यांनी कबूल केले की मार्शल लॉची त्यांची अचानक घोषणा अल्पायुषी होती.

आपला निर्णय मागे घेताना युन सुक यांनी, मी ताबडतोब नॅशनल असेंब्लीची विनंती स्वीकारत आहे आणि मंत्रिमंडळाच्या माध्यमांद्वारे मार्शल लॉ उठवत आहे,' युन यांनी आज पहाटे ४:२० (स्थानिक वेळेनुसार) राष्ट्राला

## नॅशनल असेंब्लीची विनंती मान्य



संबोधित करताना सांगितले, मी लगेचच मंत्रिमंडळाची बैठक बोलावली सकाळची वेळ असल्याने अद्याप कोरम पूर्ण झालेला नाही, कोरम पूर्ण होताच मी मार्शल लॉ उठवीन.' युन यांच्या भाषणानंतर सुमारे ३० मिनिटांनी पुन्हा मंत्रिमंडळाची बैठक बोलावण्यात आली आणि लष्करी कायदा उठवण्यास मान्यता देण्यात आली. संबंधित कायद्यानुसार मार्शल लॉ काढण्याची ही प्रक्रिया आहे. आम्ही तुम्हाला सांगूया की राष्ट्रपतींची ही घोषणा मंगळवारी रात्री १०:२० च्या सुमारास मार्शल लॉ घोषित केल्यानंतर ६ तासांनी राष्ट्र वाचवण्याच्या तीव्र इच्छेने आली. मात्र, या ६ तासांत दक्षिण कोरियात प्रचंड गोंधळ उडाला. या घोषणेनंतर सेना, विरोधी पक्षाचे खासदार आणि सर्वसामान्य नागरिक रस्त्यावर उतरले. जनतेचा प्रचंड विरोध पाहून अध्यक्षांना आपला आदेश मागे घ्यावा लागला. याआधी मंगळवारी संध्याकाळी उशिरा राष्ट्राध्यक्ष यून यांनी 'राज्यविरोधी शक्तींचा नायनाट करण्याची' गरज सांगून मार्शल लॉ जाहीर करून देशाला धक्का दिला होता. या घोषणेनंतर सत्ताधारी आणि विरोधी दोन्ही पक्षांच्या खासदारांनी मंगळवारी पहाटे एकच्या सुमारास विधानसभेचे तातडीचे पूर्ण अधिवेशन बोलावले.

# सरकारवर टीका करणाऱ्या रॅप गायकाची सुटका

## एक वर्षापेक्षा अधिक काळ होता तुरुंगात

वृत्तसंस्था

**दुबआ** : इराणने आज सरकारवर टीका करणाऱ्या एका लोकप्रिय गायकाची तुरुंगातून सुटका केली. माहसा आमिनी या युवतीचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्यानंतर भडकलेल्या आंदोलनात गीताच्या माध्यमातून सरकारवर टीका केल्याप्रकरणी या गायकाला अटक करण्यात आली होती. तूमाज सालेही असे या रॅप गायकाचे नाव असून त्याने एक वर्षापेक्षा थोडा अधिक काळ तुरुंगात घालवला होता.

इराणमधील रिव्होल्युशनरी गार्डने त्याला देहदंडाची शिक्षा सुनावली होती. रिव्होल्युशनरी गार्डची सुनावणी सर्वसाधारणपणे बंद कक्षामध्येच होत असते आणि ज्याच्याविरुद्ध खटला चालवला जातो, त्याला फारच कमी वेळा बचावाची संधी दिली जात असते. त्यानुसार सालेही याच्याविरुद्धची सुनावणीदेखील बंद कक्षातच झाली होती.



सालेही हा ग्रॅमी पुरस्कार विजेता गायक आहे. त्याला फाशीची शिक्षा सुनावली गेल्यानंतर त्यावर आंतरराष्ट्रीय पातळीवरून मोठी टीका झाली होती. त्यानंतर जून महिन्यात शिक्षेचा निर्णय बदलण्यात आला होता. रविवारी त्याला तुरुंगातून सोडण्यात आले, असे इराणमधून प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्राने म्हटले आहे. कलाकारांच्या अभिव्यक्तीला किती गंभीर धोका आहे, हेच या उदाहरणावरून दिसून येते, असे न्यूयॉर्कमधील आर्टिस्ट ॲट रिस्क कनेक्शन या गटाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे. सालेही याला पहिल्यांदा २०२२ मध्ये झालेल्या आंदोलनादरम्यान अटक केली गेली होती. त्याला जामीन मिळाला आणि नोव्हेंबर २०२३ मध्ये पुन्हा तुरुंगात टाकले गेले होते. तुरुंगात त्याचा छळदेखील केला गेला होता.

# जागतिक स्तरावर शस्त्रास्त्रस्पर्धा तीव्र

## ६३२ बिलियन डॉलर्सची विक्री

**स्टॉकहोम** : जगातील अनेक हिस्स्यांमध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळे शस्त्रास्त्रविक्रीची चढाओढ तीव्र झाली आहे.

युक्रेन आणि गाझामधील युद्धात आणि आशियातील तणावामुळे प्रमुख शस्त्रास्त्र उत्पादकांच्या विक्रीत वृद्धी झाली आहे. स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या अहवालानुसार जगातील १०० सर्वात मोठ्या शस्त्रास्त्र कंपन्यांची विक्री २०२३ मध्ये ४.२ टक्क्यांनी वाढून ६३२ बिलियन डॉलर्सवर पोहोचली. अहवालानुसार २०२२ मध्ये शस्त्रनिर्मितीशी निगडित उत्पन्नात घट दिसून आली होती, कारण शस्त्रास्त्रउत्पादक मागणीतील वृद्धी पूर्ण करण्यासाठी झगडत होते; परंतु मागील वर्षी यातील अनेक कंपन्या उत्पादन वाढविण्यास यशस्वी ठरल्या आहेत.

## नेपाळ-चीनमध्ये ९ मुद्द्यांच्या करारावर स्वाक्षऱ्या

**बीजिंग** : नेपाळचे पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांच्या चीन दौऱ्यात दोन्ही देशात ९ मुद्द्यांच्या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. ओली यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी कनेक्टिव्हीटी, औद्योगिक विकास, पायाभूत सुविधा, व्यापार आणि पर्यटनासह अन्य विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली.

# पप्पू यादवांना धमकवणारा निघाला समर्थक

## बिश्नोई गँगशी संबंध नाही!

वृत्तसंस्था

**पूर्णिया** : बिहारचे पूर्णियाचे खासदार पप्पू यादव यांना सातत्याने धमक्या येत आहेत. लॉरेन्स बिश्नोई यांच्या संदर्भात टीकात्मक टिप्पणी केल्यानंतर हा प्रकार सुरू झाला होता. मात्र, आता या प्रकरणाला नवा ट्विस्ट आला आहे. धमक्या देणारी व्यक्ती अन्य कोणी नसून पप्पू यादव यांचाच समर्थक असल्याचे तपासात पोलिसांना आढळून आले आहे.

यादव यांना भोजपूरहून धमकीचा व्हिडिओ मेसेज पाठवणाऱ्या रामबाबू नावाच्या व्यक्तीला पूर्णिया पोलिसांनी अटक करून त्याची चौकशी केली असता त्याने संपूर्ण सत्य उघड केले.




**शिवपुरी** : राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने मध्य प्रदेशच्या शिवपुरी जिल्ह्यातील माधव राष्ट्रीय उद्यानाला व्याघ्र प्रकल्प म्हणून तत्वतः मान्यता दिली आहे. यामुळे माधव राष्ट्रीय उद्यान हे मध्य प्रदेशातील नववे व्याघ्र प्रकल्प बनणार आहे. आता राज्य सरकारकडून अधिकृत अधिसूचना प्रलंबित आहे.

# सायबर हल्ल्यांमध्ये भारत पहिल्या क्रमांकावर

वृत्तसंस्था

**नवी मुंबई** : भारतात स्मार्टफोन वापरणाऱ्यांची संख्या जास्त आहे. डिजिटल अर्थव्यवस्था वाढत आहे. अशा परिस्थितीत भारतावर होत असलेले सायबर हल्ले जगातील इतर देशापेक्षा जास्त होत असल्याची माहिती समोर आली आहे. बँकांवर झालेले मालवेअर अटॅक गेल्या वर्षी २९ टक्क्यांनी वाढले. तर मोबाईल्स स्पायवेअर अटॅक तब्बल १११ टक्क्यांनी वाढले आहेत.

जगभरात झालेल्या २० अब्ज सायबर हल्ल्याचे विश्लेषण करून यासंदर्भात स्कॅलरथ्रेट लॅबने हा अहवाल तयार केला आहे. मोबाईल, इंटरनेट ऑफ थिंग्स आणि इतर इंटरनेट आधारित उपकरणावर झालेल्या हल्ल्याचा अभ्यास करण्यात आला आहे. जून २०२३ ते मे २०२४ या कालावधीत झालेल्या सायबर हल्ल्याचा अभ्यास करण्यात आला आहे.

## चालू वर्षात २८ टक्के सायबर हल्ले!

या वर्षात एकूण झालेल्या सायबर हल्ल्यापैकी २८ टक्के सायबर हल्ले भारतावर, २७.३ टक्के अमेरिकेवर, १५.९ टक्के कॅनडावर झाले. भारतातील बँका, माहिती तंत्रज्ञान कंपन्या आणि सरकारने सायबर हल्ले होऊ नये त्यासाठीची यंत्रणा अधिक बळकट करण्याची गरज वाढली आहे. विशेषतः मोबाईल वापरणाऱ्या नागरिकांनी आणि बँकांनी अधिक सावध राहून व्यवहार करण्याची गरज आहे. सायबर हल्लेखोराचे संशोधन आणि विकास बँकाच्या एक पाऊल पुढे असते, असे यातून आढळून येते.

## स्पायवेअर अटॅकमध्ये वाढ



मोबाईल वापरणाऱ्यांना फसवून त्यांच्याकडून त्यांच्या बँक खात्याची माहिती जमवली जाते. नंतर रक्कम पळविण्याचा प्रयत्न केला जातो. अनेकदा बँकावरही असे हल्ले झाले आहेत. या अगोदर सायबर हल्ल्यात भारत तिसऱ्या क्रमांकावर होता. मात्र, आता तो अमेरिका आणि कॅनडाला मागे टाकून पहिल्या क्रमांकावर आला आहे. प्लेस्टोअर असणाऱ्या कंपन्यांनी हल्लेखोरांची ॲप आपल्या प्ले स्टोअरवरून काढून टाकण्याची गरज निर्माण झाली आहे. सुदैवाची बाब म्हणजे भारतातून होणारे सायबर हल्ले आता कमी झाले आहेत. या अगोदर सायबर हल्ले होण्यात भारत सातव्या क्रमांकावर होता.

# सिरसाळा एमआयडीसीचा मार्ग मोकळा!

## दिलासा — निवडणुकीत धनंजय मुंडेंनी दिले होते आश्वासन

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी परळी तालुक्यातील शिरसाळा येथे औद्योगिक विभागाने अधिग्रहीत केलेल्या जागी पंचतारांकित एमआयडीसी पूर्ण करण्याचा ध्यास घेतलेला असून एमआयडीसीमध्ये प्रत्यक्ष उद्योगांना सुरुवात करण्याच्या दृष्टीने एमआयडीसी पूर्णत्वाच्या साठी अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.



धनंजय मुंडे यांच्या विनंतीनुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे शिरसाळा येथे अधिग्रहित करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवर औद्योगिक क्षेत्रात पूरक बाबी विकसित करण्यास औद्योगिक विकास महामंडळाने मंजुरी दिली असून, यामध्ये प्रामुख्याने २० मीटर मुख्य रस्ता, १२ मीटर अंतर्गत रस्ते, १५ मीटर सर्व्हिस रस्ते यांसह लघु व मध्यम उद्योगांसाठी राखीव जागा (प्लॉट) निर्मितीसाठी त्याचबरोबर सहाय्यभूत सुविधा निर्माण करण्याच्या प्रस्तावास औद्योगिक विकास महामंडळाने मंजुरी दिली आहे.

सिरसाळा येथे अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनीवर एकूण १६ हेक्टर क्षेत्र हे संबंधित सुविधांसाठी मंजुर करण्यात आले असून, यासाठी धनंजय मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. धनंजय मुंडे यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिरसाळा येथील मंजूर असलेल्या एमआयडीसीला पूर्णत्वाकडे नेऊन या ठिकाणी पायाभूत सुविधांची निर्मिती करणे तसेच येथे उद्योगांना निमंत्रित करण्याचे आश्वासन दिले होते; या शब्दाला पूर्ण करण्यासाठी आणखी आमदार म्हणून शपथ घेणे सुद्धा बाकी असतानाच मुंडेंनी आपल्या कामाला सुरुवात केल्याचे पाहायला मिळत आहे.सिरसाळ्यात सुमारे २०० हेक्टर पेक्ष्या अधिक क्षेत्र हे एमआयडीसी म्हणून घोषित करण्यात आले असून त्यापैकी ७८ हेक्टर पेक्षा अधिक जमीन आतापर्यंत अधिग्रहित करण्यात आली आहे. सदर ठिकाणास राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे सह दळणवळणाच्या सोयी व पाण्याची उपलब्धता प्रमाणात असल्याने येथे उद्योग उभारणीस मोठा वाव आहे. त्यामुळे सदर एमआयडीसी पूर्ण झाल्यास याठिकाणी मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती करण्याचा धनंजय मुंडे यांचा प्रयत्न आहे.

# वन्य प्राण्यांपासून शेतकऱ्यांच्या जीवितास धोका

## राजेभाऊ फड :अन्यथा तीव्र आंदोलन

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

स्वतःचा जीव धोक्यात घालत अवघ्या जगाचे पालनपोषण करणाऱ्या बळीराजाच्या भोवती अनेक संकटे घोंगावत असतात. कधी कृत्रिम अडचणी येतात तर कधी कधी नैसर्गिक धोके निर्माण होतात. परळी तालुक्यात अनेक ठिकाणी बिबट्यासह अनेक वन्य जीवांचा मुक्त वावर असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांच्यापासून हल्ले होण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत. त्यामुळे वारंवार संकटाशी खेळणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाने दिवसाचा विजपुरवठा करावा जेणेकरून त्याच्यावरील अपघाताचे घोंगावणारे संकट दूर होऊ शकेल. शासनाने आणि विजवितरण कंपनीने याचा गंभीर्यपूर्वक विचार करावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी



दिला आहे.

अस्मानी आणि सुलतानी संकटाचा नेहमीच शेतकऱ्यांना सामना करावा लागतो. कमी असलेला हमीभाव, कधी दुष्काळ तर काढू अतिवृष्टी अशा या ना त्या कारणाने नेहमीच संकटे घोंगावत असतात. त्यातच

पान २ वर...

# लोणार येथे भव्य सत्कार सोहळा !



लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार येथे आज ४ डिसेंबर रोजी नियुक्ती आमदार सिद्धार्थ जी खरात साहेब यांच्या भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. हा सत्कार सोहळा भव्य दिव्य असा झाला. लोणार शहर व परिसरातील ग्रामीण भागामधून फार मोठ्या प्रमाणामध्ये कार्यकर्ते व जनता उपस्थित होती. यावेळी सत्काराला उत्तर देताना मा आमदार खरात साहेब यांनी आपण सर्वसामान्यांचे आमदार आहोत. आपल्याच आशीर्वादाने मी आज आमदार झालो आहे . आपल्या ज्या अडचणी आहेत त्या मी सोडवण्याचा प्रयत्न करीन तसेच मागील पंचवीस तीस वर्षापासून लोणार शहर व लोणार परिसरामध्ये कुठल्याच प्रकारची विकास कामे झाली नाही ती सर्व विकास कामे करण्याचा प्रयत्न मी करणार आहे. लोणार या पर्यटन स्थळासाठी मी लक्ष घालून लोणार विकास आराखडा पूर्णत्वास नेणार आहे. असे आश्वासन यावेळी दिले. मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष मा लक्ष्मण दादा घुमरे काँग्रेसचे पक्षनेते मा ॲड अनंतराव वानखेडे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मा प्रकाश धुमाळ शिवसेनेचे नेते मा किशोर गारोळे मा गोपालसिंग बच्चीरे मा बादशाह खान यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आयोजन मा भूषण मापारी व त्यांच्या सहकार्याने केलेले होते फार मोठ्या प्रमाणामध्ये हा कार्यक्रम त्यांनी

पान २ वर...

# सिंदफणा शाळेच्या यशात पडली भर

## क्रीडा:तीन विद्यार्थ्यांची स्पर्धेसाठी निवड

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलच्या तीन विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर आपले स्थान निर्माण केले आहे. शिवम कापसे, स्नेहल शिंदे आणि शिवराज कंटुले या विद्यार्थ्यांची सीबीएसई बोर्ड स्कूल गेम्स वेलफेयर सोसायटी (उइडएथङ्ज) अंतर्गत राष्ट्रीय वॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांच्या या कामगिरीबद्दल शाळा तसेच बीड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंद व्यक्त होत आहे.

सविस्तर वृत्त असे की, वाराणसी (उत्तर प्रदेश) येथे दिनांक १० ते १४ डिसेंबर



२०२४ दरम्यान होणाऱ्या १४ वर्षांखालील मुला-मुलींच्या राष्ट्रीय वॉलीबॉल शालेय क्रीडा महोत्सवात या

पान २ वर...



परळी: मुंबईतील देवगिरी निवासस्थानी आ.धनंजय मुंडे, अजित पवारांची भेट घेऊन शुभेच्छा देतांना, अमरसिंहपंडित,संजय भाऊ दौंड आदी.

# प्रभू विश्वकर्मा संघटनेच्या निवडी

## अभिनंदनिय:तालुकाध्यक्षपदी श्यामसुंदर पांचाळ

माजलगाव/ पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रभू विश्वकर्मा सुतार समाज संघटनेच्या माजलगाव तालुकाध्यक्षपदी गोविंदपुरचे उपसरपंच श्यामसुंदर नामदेव पांचाळ यांची निवड करण्यात आली.गुडलक लॉन्स येथे गुरुवार दि.५ डिसेंबर रोजी समाज बांधवांच्या वतीने ही निवड करण्यात आली.माजलगाव तालुक्यात सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे श्यामसुंदर पांचाळ यांची माजलगाव तालुक्यात सर्वत्र ओळख आहे. सुतार समाजाच्या अनेक सामाजिक कार्यात त्यांचे योगदान.समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी



काम केले आहे.सुशिक्षित बेरोजगार,सुतार कामगार यांना शासकीय सवलती मिळाव्यात यासाठी त्यांचा नेहमीच प्रयत्न सुरू असतो. दरम्यान शामसुंदर पांचाळ यांचा प्रभू विश्वकर्मा सुतार समाज संघटनेच्या निवडीने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे. या निवडी वेळी बालासाहेब पांचाळअशोक डिगंबरे,सुभाष ननवरे, गणेश पोचाळ,भागीरथ पांचाळ,गोविंद पांचाळ,रामभाऊ पांचाळ,मसुनिल पांचाळ,रामकृष्ण पांचाळ,किशोर पांचाळ,जगदीश शिलपे,उत्तरेशोर पांचाळ,नारायण पांचाळ,उद्धवराव पांचाळ,

पान २ वर...

# पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड

## शैक्षणिक:डॉ.अविनाश गोले पाटील यांचे यश

गंगामसला/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मोठीवाडी येथील रहिवासी असलेले डॉ.अविनाश गोले पाटील हे प्राथमिक आरोग्य केंद्र कीट्टी आडगाव येथे वैद्यकिय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत, त्यांचा पदव्यूत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.

वैद्यक शास्त्रातील पदव्युत्तर शिक्षणासाठी अनेकजन प्रयत्न करत असतात, या प्रयत्नात यशस्वी होणे ही वैद्यकशास्त्रातील शिक्षण घेणाऱ्यांसाठी एक मोठी संधी मानली जाते, अशा या



कधी तर शिक्षणासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. अविनाश गोले पाटील यांची निवड झाली आहे (च.ऊ चएऊखउखछए ) औषधवैद्यकशास्त्र या विषयासाठी शासकीय वैदयकीय महाविद्यालय व रुग्णालय छ. संभाजीनगर येथे ते आपला पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करणार आहेत, सेवांतर्गत वैद्यकिय अधिकारी प्रावीण्य यादीत त्यांचा चौथा क्रमांक आहे. त्यांच्या विशेष प्राविण्या बद्दल नागडगावचे माजी सरपंच विनायकराव कदम, रामदास गिते, गोरखनाथ सोळंके, परमेश्वर डाके, राजाभाऊ आव्हाड, चंद्रकांत खेत्री, पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे, भाई ड.नारायण गोले पाटील, प्रा. डॉ. संतोष रणखांब, पत्रकार

पान २ वर...



मुंबई : राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्याबद्दल पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भेट घेऊन सत्कार केला. यावेळी माजी नगरसेवक रविंद्र कदम आदी.

## ऋणानुबंध — रुपचंद आभारेंच्या वाढदिवसानिमित शुभेच्छांचा वर्षाव

# प्रतिमा उंचावणारे कर्तव्यदक्ष तलाठी

बाळासाहेब आडागळे/माजलगाव

तलाठी संघटनेचे अध्यक्ष रूपचंद आभारे साहेब म्हणजे एक विश्वासार्ह व्यक्तीमत्व आहे. एवढेच नव्हे तर ते एक लोकाभिमुख, चारित्र्य संपन्न, अभ्यासु, समतोल दुरदृष्टी, योग्यता, कार्यक्षमता, धडाडी, जिद्द, सामान्यांच्या प्रश्नांची जाण, कुशाग्र बुध्दीमत्ता, प्रशासकीय नैपुण्य व सुसंस्कृतपणा या त्यांच्या गुणांमुळे माजलगाव च्या कानाकोपऱ्यात त्यांच्याबद्दल कमालीचा जिव्हाळा निर्माण झाला आहे. म्हणूनच आज ते सर्व सामान्य जनतेच्या नजरेत दी ग्रेट रियल हिरो ठरले असुन त्यांच्या कार्यामुळे त्यांनी निश्चितच माजलगाव ची प्रतिमा उंचावलेली आहे.



इतिहासामध्ये आपल्या कार्याचा चांगलाच ठसा उमटवत प्रशासकीय अधिकारी हे जनतेचे सेवक असतात हे दाखवून दिल्याने आभारे यांनी तुफान लोकप्रियता मिळवली आहे. यांचा अग्रक्रमाने नामोल्लेख करावा लागेल. अगदी प्रमाणिकपणे आणि मोठ्या निष्ठेने आपले कार्य चोख बजावताना दिसून येतात. रुपचंद आभारे या अधिकाऱ्यांचे कार्य सुवर्ण अक्षरात लिहिली गेली पाहिजेत असा इतिहास निर्माण केला आहे. तसे पाहता या माजलगाव चे काम करण्यास अनुत्सुक असतात त्याचे कारण या ठिकाणी स्पष्ट करण्याची गरज नाही ते सर्वश्रुत आहे.

पण 'त्या' कारणाला छेद देण्याचे काम तलाठी संघटनेचे यांनी केले आहे. हे कोणालाही कबुल करावे लागेल. लोकप्रियतेच्या लाटेवर स्वार झालेले एक विलोभनीय व्यक्तिमत्व म्हणजे तलाठी संघटनेचे अध्यक्ष रूपचंद आभारे साहेब होय! कारण एखाद्या अधिकाऱ्याच्या यशापयशाची बीजे त्यांच्या स्वभावात व मानसिकतेत दडलेली असतात. त्यांच्या बोलण्या-चालण्याच्या व वागण्याच्या माध्यमातून ती बीजे अंकूरतात. प्रयत्न केला तर ती पल्लवीत आणि पुष्पित होतात. त्यांच्या बाजूला कळत-नकळत तण ही माजते पण ते काढून टाकण्याची दक्षता घ्यावी लागते. आभारे साहेबांच्या स्वभावात कर्तृत्वाची ती बीजे आहेत. त्यात सुसंस्कृतता, मैत्रभाव, सौंदर्यासक्ती, उपक्रमशीलता, धैर्य, विकासाची ओढ, लोकसंग्राहाची आस, भविष्यलक्ष्यी आशावाद, गुणग्राहकता, औदार्य, मुत्सद्दीपणा, विधायकता, सामान्यांच्या प्रश्नांची जाण इत्यादी गुण त्यांच्यात आहेत. म्हणूनच त्यांच्या या गुणांना रंगरूप, सुगंध देण्याचा त्यांच्या कर्तृत्वामधून हा प्रामाणिक प्रयत्न दिसून येतो त्यामुळेच त्यांना यश आणि किर्ती मिळत आहे. एकूणच सामान्य जनतेची कामे हातोहात करण्याचे त्यांचे कौशल्य वाखाणण्याजोगी आहे. म्हणूनच आज ते सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने एक कर्तव्यदक्ष अधिकारी हे माजलगाव ची प्रतिमा उंचावणारे आभारे साहेबच रुपचंद आभारे साहेब कोणत्याही संकटाला तोंड देण्याची तयारी ठेवत होते त्यामुळे त्यांच्या जिद्दीने यशाला गवसणी घातली, अतिशय खडतर प्रवास रूपचंद आभारे यांनी पार केला असल्याने यशाच्या मार्गावर त्यांची गाडी आज सुसाट धावत आहे .यांच्या जीवनात सर्वसामान्य व्यक्तीसाठी मोठे स्थान

पान २ वर...

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप

## माणूसकी: सहारा अनाथालयात राबविला उपक्रम



गेवराई/ पुण्यभूमी प्रतिनिधी

सहारा अनाथालयातील १२७ विद्यार्थ्यांना थंडीपासून बचावासाठी स्वेटरचे वाटप करण्यात आले होते. गुरुवार (५ डिसेंबर ) रोजी खासदार सौ रजनीताई पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेद्रे यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमासाठी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष किरण अजबकर जिजा जगताप सहारा अनाथालयाचे संतोष गर्जे सर हे उपस्थित होते. याप्रसंगी सहारा अनाथालयच्या

पान २ वर...